म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. ९८०४०




REFBK-0015575
REFBK-0015575

मौज प्रकाशन गृह, मुंबई ४




REFBK-0015575
REFBK-0015575

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
१५५६५

मौज प्रकाशन गृह, मुंबई ४

मौज प्रकाशन : १४०

दुसरी आवृत्ती : ऑक्टोबर १९६६

© १९६६, इंदिरा संत

किंमत साडेचार रुपये

मुखपृष्ठ :
पद्मा सहस्रबुद्धे

पहिली आवृत्ती : १९५१

प्रकाशिका : सौ० सुधा रायकर

प्रकाशक :
वा० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

मुद्रक :
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम ........ वि: काव्य
क्रमांक ........ नों: दि:

## अनुक्रम

| | |
|---|---|
| शेला | १ |
| केव्हापासून ही | २ |
| आई | ३ |
| कुठे | ४ |
| कोठे खोल तळांत | ५ |
| माझी प्रीति | ६ |
| चाहूल | ७ |
| ये रे, ये रे | ८ |
| दातकणी | ९ |
| प्रतीक्षा | १० |
| बाळ होता रंगला | ११ |
| या हो सूर्यनारायणा | १२ |
| गाई गाई | १४ |
| चिमुकलें डबकें | १६ |
| आसवें | १९ |
| कातरवेळेला | २१ |
| ही निळीपांढरी | २२ |
| झंझावात | २४ |
| उत्फुल्ल पीत हें | २६ |
| ठरवितें किती मी | २८ |
| एक क्षण | २९ |
| सांडगे | ३० |
| अडखळे | ३१ |
| खुणा | ३२ |
| वाटे मला | ३४ |
| कधि जीवन वाटे | ३६ |
| नाल | ३८ |
| तुझ्या घराला | ४० |
| होऊन माझ्यांतून निराळी | ४१ |
| अवचित | ४२ |
| स्वाधीन | ४३ |
| नक्षत्रफुलें | ४४ |

| | | | |
|---|---|---|---|
| सागरा | ४५ | अजूनही | ६४ |
| निघतांना | ४७ | अकालीं येती | ६५ |
| कलावंतिणीचा वेल | ४८ | मध्यरात्रीं | ६६ |
| तुझ्या वाटेवर | ४९ | भृंग | ६७ |
| गजांतुनी मी | ५० | भाग्यलक्ष्मी | ६८ |
| पत्राचे कपटे | ५१ | अशुभ | ६९ |
| चांदणें | ५२ | पूर्णविराम | ७० |
| पाखराच्या पिसापरी | ५३ | विस्तीर्ण गुहा ही | ७१ |
| घुंगुर | ५४ | सोन्याची घागर | ७२ |
| धूसर विरल | ५५ | आगगाडिंतिल खिडकीपाशीं | ७३ |
| आली माहेरपणाला | ५६ | कौतुक | ७५ |
| बोलायला निवांत कांही | ५७ | चतुर कुशल तूं | ७६ |
| नादतंद्रा | ५८ | कोवळ्या अंधारीं | ७७ |
| दीपावली | ६१ | समर्पण | ७८ |
| पतंग | ६३ | चंद्रकोर | ८० |

## पहिल्या आवृत्तीचे निवेदन

'सहवास'नंतर बरोबर दहा वर्षांनी माझा असा हा कवितासंग्रह निघत आहे. 'सहवास'मधील काही कविता या संग्रहात पुन्हा घेतल्या आहेत. इतर बहुतेक कविता 'सत्यकथा' व 'साहित्य' या नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत.

ठळकवाडी, बेळगांव
ऑक्टोबर, १९५१

इंदिरा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५५६५

# माझी कविता आणि मी

भावकविता लिहिणारा कवी ज्या वेळी कविता लिहून संपवितो, त्याच वेळी त्या कवितेपासून तो मुक्त होतो, असं म्हणायला हरकत नाही. रसिकानं जाणावं असं जेवढं कवीला वाटतं तेवढं तो कवितेच्या रूपानं रसिकापुढं ठेवतो. ती लिहीत असता, ही कविता आपल्याला कशी सुचली, आपण ती कशी रचली, इत्यादि विचार त्याच्या मनात नसतात. लिहून झाल्यावर तर मग ते नसतातच. आपण एक चांगली कविता लिहिली याच आनंदात तो तरळत असतो.

पण त्याच वेळी रसिकाचं कुतूहल जागृत होतं. तो विचारू लागतो, "ही कविता कशी सुचली? कशी केली? स्वतःच्या कवितेबद्दल आणि एकंदर काव्याबद्दल कवीचे विचार कोणते आहेत?" रसिकाला हे कुतूहल असणं स्वाभाविक आहे. पण त्या सर्व कुतूहलाचं समाधान करणं मात्र कवीला जमेलच असं नाही.

पण प्रयत्न करून पाहायला काय हरकत आहे?

कविता करणं हा माझा एक अत्यंत आवडीचा छंद आहे.

कवितालेखनाच्या जाणिवेनं मी कविता लिहू लागले ती १९३१ पासून, पण कवितावाचनाचा नाद मला अगदी लहानपणापासून होता. त्यावेळी आमच्या घरात जुने 'मनोरंजन'चे खूप अंक होते. त्यातल्या कविता वाचायला—वारंवार वाचायला—मला फार आवडत. वेलबुट्टीच्या मखरात ठळक टाइपात छापलेल्या त्या कवितांचा अर्थ त्यावेळी मला कितपत कळत होता हे आठवत नाही. पण मीही तशाच दोनचार ओळी रचायचा प्रयत्न करीत असे, असं मला आठवतं.

या कवितावाचनाच्या आवडीतूनच मला आणखी एक छंद लागला. इंग्रजी शाळेत शिकत असताना मी स्त्रीगीतं जमवू लागले. हा माझा छंद अगदी कॉलेजचं शिक्षण पूर्ण होईपर्यंत टिकला होता. या ओव्या मला फार आवडत म्हणून मी गोळा करीत असे. आमच्या तवंदी या खेडेगावी मी खूप राहिले आहे. एरवी लौकर न उठणारी मी झुंजुमुंजू झालं की त्यावेळी जागी होत असे. पलिकडल्या खपरेलातून जात्याच्या सुरावर रेखलेले ओवीचे सूर ऐकू येऊ लागले की मला अंथरुणात पडून राहाणं अशक्य होत असे. रयतांच्या घरी जाऊन, मिळेल त्या कपट्यावर मला नवी वाटणारी ओवी मी लिहून घेत असे. कोल्हापुरास कॉलेजमध्ये असताना अंबाबाईच्या देवळात जाऊन तिथल्या आजीबाईंच्याकडून कितीतरी ओव्या मी लिहून घेतल्या. माझ्या संग्रही असलेल्या ओव्यांत इतकं सुंदर काव्य भरलेलं आहे, की त्यानं कुणाही रसिकाचं मन आकंठ तृप्त व्हावं.

> "फुलामध्ये फूल, फूल हुंगावं जाईचं
> सुख भोगावं आईचं ॥"
>
> "नाचणीचा कोंडा, कांही येईना काजकामा
> लेकीचा जन्म, नको घालू तू सख्यारामा ॥"
>
> "दुष्टाच्या संगतीने, मन माझें विटलें
> वाऱ्याच्या संगतीने, पान केळीचें फाटलें ॥"

अशी उदाहरणं किती नि काय द्यायची? या तीनचार ओळींच्या काव्यातली अनुभूती आणि ती अभिव्यक्त करण्याचा कमालीचा साधेपणा, आणि ज्या

प्रतिमांतून ती व्यक्त झाली आहे त्या प्रतिमांचा जिवंतपणा याला तोड नाही असं मला वाटतं.

या स्त्रीगीतांचा मनावर असा संस्कार झाल्यामुळं, त्यावेळी जे काव्य माझ्या वाचनात आलं त्यात मला फारसा रस वाटला नाही. आणि म्हणूनच मी ज्यावेळी जाणीवपूर्वक कविता लिहू लागले त्यावेळी वृत्त-जाती-राग यांचा स्वीकार न करता सरळ ओवीवृत्तातच कविता लिहू लागले. माझी बहुसंख्य कविता ओवीतच लिहिली गेली आहे.

मी ज्यावेळी कविता लिहू लागले त्या काळाकडे पाहिलं की मला असं आढळून येतं—त्यावेळी कविता विपुल प्रमाणात निर्माण झाली, आणि ती तितकीच लोकप्रियही झाली. सुनीतापासून खंडकाव्यापर्यंत तिचे प्रकार झाले. तिच्या विषयांची संख्या वाढली. कवितांना गायनाची साथ मिळाली. आणि मराठी कवितेचा हा कधी नव्हे तो उत्कर्ष झाला आहे अशी सामान्य वाचकांपासून सर्वांची कल्पना झाली.

या सर्व काव्यसंभारात काहीतरी कमी असल्याची जाणीव त्यावेळी पुष्कळांना झाली असेल. पण त्या गलबलाटात ती कुणाला समजून घ्यावीशी वाटली नसेल. लग्नाच्या वऱ्हाडात पाहुणेमंडळीची बडदास्त ठेवताना नवऱ्यामुलीकडे दुर्लक्ष व्हावं आणि ती नाहीशी झाली तरी तिकडे कुणाचं लक्ष जाऊ नये, अशी काहीशी अवस्था तेव्हा झाल्यासारखी वाटते. मराठीचा काव्यसंभार वाढला तरी रसिकाला जाणवणारं 'काव्य' त्यातून पसार झालं. आता त्या कालातील कवितेचं स्वरूप धनधान्यानं गडगंज भरलेल्या घरातील क्षीण मालकिणीसारखं मला वाटतं.

केशवसुत आणि बालकवी या आत्मनिष्ठ कवींनंतरचा हा काव्याचा कागदी फुलोरा आहे, असं मला वाटतं. आत्मनिष्ठ कवितेचं अनुकरण करता येत नाही. नथ उसनी आणता येते; पण नाक कसं उसनं आणता येईल? मोठ्या कवीचा जेव्हा संप्रदाय निर्माण होतो तेव्हा त्या संप्रदायाचं हेच वैगुण्य असतं. त्या कवीची आत्मनिष्ठा त्याच्या काव्याला कारणीभूत झाली आहे हे न ओळखून कवितांच्या बाह्यांगांचंच अनुकरण केलं जातं. मग विषय, वृत्त, अलंकार, गेयता इत्यादींचं स्तोम माजतं. बालकवींना संप्रदाय लाभला नाही

हे त्यांचं सुदैव. केशवसुतांच्या भावकवितेची मात्र नंतर भावगीतं झाली.

ज्या काळात मी कवितालेखनाला सुरवात केली त्या काळाचं स्वरूप आज मला हे असं दिसतं आहे. हे एवढं चिकित्सेनं सांगण्याचं कारण इतकंच की या कवितांचा माझ्या मनावर परिणाम का झाला नाही हे स्पष्ट व्हावं. स्त्रीगीतांच्या संस्कारानं माझ्या मनावर या कवितांचा परिणाम झाला नसला तरी मी काव्यवाचनाकडे दुर्लक्ष केलं असं मात्र नाही. त्यावेळी—म्हणजे हायस्कुलात व कॉलेजात शिकत असताना—मला मराठी कविता वाचायचा खूप नाद लागला. काही कविता तर मला अतिशय आवडल्या. बालकवींच्या कविता, पटवर्धनांचा 'विरहतरंग', अनिलांच्या कविता आणि काणेकरांची 'चांदरात' या पुस्तकांचं मला अतिशय आकर्षण वाटत असे. त्यांची मी किती पारायणं केली असतील. अजूनही वेळ जाईनासा झाला की या कविता वाचायला मला फार आवडतात.

कविता लिहिताना, कुणाच्या कवितेचं अनुकरण करावं असं मला त्यावेळी वाटत नसे. कविता लिहावीशी वाटली तरच ती लिहिली जाते अशी माझी सवय आहे. कवितेसाठी मी विषय मुद्दाम शोधीत नाही. ज्या ज्या अनुभवातून आणि परिस्थितीतून मी जात असते त्या त्या अनुभवातून आणि परिस्थितीतून जाताना काही विशिष्ट अनुभूती मनाला प्रतीत होतात. आणि मग पुष्कळ दिवसांनी ती अनुभूती कवितेत व्यक्त होते. आमच्या घरासमोर मी एक लिलीचं रोप लावलं आहे. उन्हाळ्यात ते अगदी वाळून नाहीसं होतं. इतकं की, त्याची जागाही ओळखू येत नाही. पण परवा वळवाचा पहिलाच पाऊस येऊन गेला, आणि दोन दिवसांनी दोन हिरवी पाती जमिनीवर दिसायला लागली. कवितेच्या बाबतीत असंच होत असावं. एखादी अनुभूती किंवा जाणीव मनाला स्पर्श करून जात असावी आणि मनाच्या विशिष्ट अवस्थेत ती योग्य प्रतिमांतून साकार होत असावी.

ज्यावेळी यशवंतांची 'आई' ही कविता आणि पटवर्धनांची 'प्रेमस्वरूप आई' ही कविता मी वाचत होते त्याच वेळी मीही 'आई' ही कविता लिहिली. ही कविता मी पुण्यास कॉलेजच्या पहिल्या वर्षात असताना लिहिली.

वसतिगृहात राहिल्यावर कॉलेजच्या रम्य खेळकर जीवनाची मौज मनाला सुखवीत होती. मोकळ्या मनाच्या मैत्रिणी, वाडिया लायब्ररी, वेताळाची टेकडी, ही माझी त्या वेळची सुखस्थानं होती. खूप गप्पा माराव्या, खूप वाचावं, खूप भटकावं, भर पावसात मैत्रिणींबरोबर टेकड्यांवरून हिंडावं, असा आनंदीआनंद असताना मधूनमधून मन वारंवार अस्वस्थ व्हायचं, घराची आठवण यायची. आईपासून दूर राहाण्याचा तो माझा पहिलाच प्रसंग होता. आईची उणीव फार जाणवायची—मन अगदी दाटून यायचं—कधी सुट्टी पडेल ही ओढ लागायची. मनाच्या या अवस्थेतूनच मी 'आई' ही कविता लिहिली. त्यावेळच्या माझ्या सुखदुःखांचं प्रतिबिंब तिच्यात उमटलेलं आहे. आणि त्या कवितेवर स्त्रीगीतांची झाक आहे हेही निःसंशय. ही झाली कवितालेखनाच्या सुरवातीची कविता. आई या विषयाच्या सर्वसामान्य भावनेवर मला ही कविता लिहिता आली नाही, तर आई का हवीशी वाटते या अनुभूतीच्या एका छटेवर ती रचली गेली आहे.

मी अगदी शाळेत असल्यापासून कविता करायला लागले खरी, पण कवितानिर्मितीचा म्हणून जो काही आनंद मला लाभला तो १९३२ नंतरच. तोपर्यंत कविता रचणे हा माझा एक खेळ होता. या खेळाचं महत्त्व आता मला पटलं आहे. टी० एस० इलियट यांनी एझ्रा पौंड यांच्या कवितासंग्रहाला प्रस्तावना लिहिताना जो मार्मिक मुद्दा उपस्थित केला आहे तो या ठिकाणी मला आठवतो. त्यांचं म्हणणं असं की—

*"A poet's work may proceed along two lines on an imaginary graph : one of the lines being his conscious and continuons effort in technical skill; the other, his normal human course of development, his accumulation and digestion of experience. Now and then the two lines may converge at a high peak, so that we get a masterpiece."*

लहानपणापासून कविता लिहिता लिहिता मला जी काही वृत्तं आणि जाती स्वभावतःच आवडल्या त्यांवर मी थोडीफार हुकुमत मिळवून ठेवली आणि भाषेशी खेळ करता करता भाषेच्या खुब्या आणि शब्दांचे तोल जाणून ठेवले. मनाचीही घडण होत होतीच. अनुभवातही भर पडत होती. पण

१९३२ नंतर माझ्या आयुष्यात ज्या काही घटना घडल्या त्यामुळं भाषा, वृत्त आणि अनुभव यांचा एक विशिष्ट परिपाक निर्माण झाला.

टेकडीच्या पायथ्याशी वसलेल्या फर्ग्युसन कॉलेजचं वातावरण किती रम्य! अशा वातावरणात कुणालाही काव्य करण्याची स्फूर्ती व्हायची. त्यातच श्री० पु० य० देशपांडे आणि श्री० आ० रा० देशपांडे या दोघांच्या काव्यात्म परंपरेची भर! माझ्याही काव्यात्म वृत्ती पल्लवित होऊन मोहरू लागल्या. विशिष्ट घटनांमुळं त्यांचं काव्यस्वरूप निश्चित झालं. पण या रंगदार पार्श्वभूमीचे जे ठसे माझ्या कवितेवर उमटले आहेत तेच मला आता अधिक मनोहर वाटतात. ते मला प्रिय आहेतच, आणि अविस्मरणीयही आहेत. संध्याकाळच्या वेळी निवणाऱ्या टेकडया वसतिगृहाच्या खिडकीतून मला दिसू लागल्या की बाहेर पडून केव्हा एकदा मी त्यांच्या अंगावर बागडेन असं मला होई.

'ऊन कोवळे ओलसर' मला जे मोह पाडी ते तिथलंच. आणि पदराशी मस्ती करणाऱ्या ज्या वाऱ्याचा अवखळपणा मला हवाहवासा वाटे तोही तिथलाच. 'काळे काळे उंच कडे। हिरवें तें रान पुढे' पायाखाली घालताना ज्या 'ऊन-सावलीची शोभा' माझं भान हरपून टाकी तीही तिथलीच. 'माळ' या कवितेत

"किती उत्साहाने फुलें गोळा केलीं
माळ ही गुंफिली मनोरम"

या ओळी मला पूर्वीच्या उत्कटतेचा प्रत्यय आज देत नसल्या तरी माझ्या खोलीतून दिसणाऱ्या, प्रि० महाजनींच्या बंगल्याच्या आवारात संथपणे उभ्या असलेल्या बकुळीची आठवण करून देतात. त्याच बकुळीची नाजूक वासदार फुलं वेचून मी माळा करीत असे. ही कविता वाचताना त्या फुलांचा वास अजून तीत घोटाळतो आहे असं मनाला वाटतं. 'रातराणी' हे सुनीत वाचताना डायनिंग रूमच्या बाजूला फुलून उतलेली रातराणी चांदण्याच्या मंदधूसर प्रकाशात अजून डोलताना दिसते. 'कोठे' या कवितेतल्या

"केव्हापासून पाखरू घालीतसे गोड शिळा
कुठे बोलवीतें मला"

या ओळींवरून नजर फिरवली तर खिडकीसमोरच्या आंब्यावर बसून ठरावीक

वेळी घुमत राहाणाऱ्या माझ्या ओळखीच्या शुभ्र पारव्याचं चित्र नजरेला दिसू लागतं. आणि पुढे अधीर मनाचं

"अधीरून गेलें मन, पंख राही फुगवूनी
कुठे जाणार उडूनी"

असं जे वर्णन आहे ते आता मनाचं वाटत नसून, त्या पारव्याचा उडून जाण्यापूर्वी पंख फुगविण्याचा जो चाळा मी पाहिला होता त्याचंच वाटतं.

अशा कितीतरी गोड अन मधुर आठवणी या कवितांच्या संपुटात साठून राहिल्या आहेत.

१९३० ते १९३५ पर्यंत मी बऱ्याच कविता लिहिल्या. पण नंतरच्य नऊदहा वर्षांत वीस तरी कविता लिहिल्या की नाही कुणाला ठाऊक! संसाराच्या व्यापामुळं लिहू शकले नाही असं नाही. कवितालेखनाला परिस्थिती आड येत नाही असं माझं मत आहे. आजपर्यंतच्या माझ्या अनुभवावरून मी असा तर्क केला आहे की, मनाला ओढ असली की मग मी कवितालेखनाकडे वळते; किंवा विरंगुळा हवा असेल तर कविता लिहावीशी वाटते. या दोन्हींपैकी एका परिस्थितीनं मनाचा पारा एका विशिष्ट अंशापर्यंत पोचला की मग कविता लिहिली जाते. अनुभव जाणवला रे जाणवला की लगेच तो शब्दबद्ध करण्याचं माझं सामर्थ्य नाही.

'खुणा' या कवितेचा इतिहास हा असा आहे : एकदा मी कॉलेजला जात होते. ज्या रस्त्यानं मला जावं लागतं तो डांबरी नसून धुळीचा आहे. एकदा या रस्त्यानं जात असता, बरीचशी पिवळी पानं वाऱ्याच्या मंद आवर्तात फिरताना मला दिसली. फार गंमत वाटली म्हणून पाहात उभी राहिले. ती पानं फिरत असतानाच त्या धुळीवर सुंदर नाजूक रेषा उमटत होत्या आणि वाऱ्यानं लगेच पुसल्या जात होत्या. त्या फेरातून तोच अनुभव मनानं टिपला. आणि मग मला वाटतं, जवळजवळ दोनतीन महिन्यांनी मी ती कविता लिहिली. आता त्या कवितेतील आशय त्या खुणेच्या दृश्यातून निर्माण झाला की, मनाच्या अवस्थेनं त्या प्रतिमेत प्रवेश केला हे सांगणं अवघड आहे.

जागरूकपणे कविता लिहीत असता, म्हणजे अनुभूतीला शब्दाकार देत असता, कवी निर्लेपपणानं बाह्य उपाधींना, संकेतांना विसरून, मनातील इतर भावभावनांना, विचारांना दूर सारून त्या अनुभूतीलाच जितका चिकटून राहील तितकी ती अनुभूती विशुद्ध स्वरूपात प्रतिमांतून प्रकट होईल. शुद्ध भावकविता ती हीच असं मला वाटतं. कवितेतील आत्मनिष्ठा ती हीच. हे अनुभूतीचं विशुद्ध स्वरूपच प्रतिमेत जिवंतपणा आणतं, आणि शब्दांना सामर्थ्य देतं. हे असं व्हायला मन 'प्रिमिटिव्ह' असायला हवं. म्हणजे मनाला संस्कारातीत राहाण्याची, घटवलेल्या भावनांतून अलिप्त राहाण्याची शक्ती हवी.

कवितेचा विषय, मनाच्या विशिष्ट अवस्थेच्या उष्णतामानातून कसा निर्माण होतो, याला माझी 'वाटे मला' ही कविता उदाहरण म्हणून घेण्याला हरकत नाही. स्वतःला विसरून जाण्याच्या—स्वतःभोवतीच्या सर्व पाशांतून मुक्त होण्याच्या—तीव्र जाणिवेतून ही कविता लिहिली गेली. माझी प्रत्येक कविता ही त्या त्या मनोवृत्तीच्या लहरीची अभिव्यक्ती आहे. तो क्षणिक भाव, ती अनुभूती शब्दात साकार करण्याची मला आता सवय लागली आहे. त्यातही जे वाटतं—जे जाणवतं पण काय ते सांगता येत नाही, असं काही शब्दांमध्ये पकडण्याची मला आवड आहे. 'सावध' ही अशा प्रकारची एक माझी कविता आहे.

"आज अखंड मी जागी
रात्र धरून डोळयांत"

सुखाचा किंवा दुःखाचा एक क्षण जशाचा तसा धरून ठेवण्याच्या जाणिवेतून ही कविता साकार झाली आहे. ही जाणीव व्यक्त करताना मी रात्रीच्या प्रतिमेचा का उपयोग केला, याचा आता विचार करू लागले की मला वाटतं... दिवस हा विस्कटलेला असतो. त्याची आकृती आणि त्याची घनता दोन्हीही. पण रात्र मला दिसते ती उत्कट, सघन आणि एकसंध. त्या क्षणासारखीच. या जाणिवेनं मी ती प्रतिमा घेतली असावी. पण लिहिते वेळी हे कारण स्पष्ट नव्हतं—एकदम दोन ओळी मनात आल्या, आणि मग इतर सर्व प्रतिमा तिच्याभोवती आपोआपच जमा झाल्या.

कविता लिहिताना मी जाणीवपूर्वक प्रयोग असा कधी करीत नाही—कधी करीन असं मला वाटतही नाही. प्रयोगाची जाणीव कविता लिहिताना तीव्र झाली तर त्यामुळं तिच्यातील काव्याला बाध येईल असं मला वाटतं. जर प्रयोगच म्हणायचं झालं तर माझा एकच प्रयोग चालतो. एकदा कवितेचं बीज सापडलं की, ती कविता रचताना मी कधी घाई करत नाही. कितीतरी दिवस ती कविता मनातच तयार होत असते. शब्द आणि प्रतिमा यांच्याबद्दल मी अतिशय काटेकोरपणा करीत असते. शब्द सोडा, एखादी मात्राही कवितेचा तोल घालविते किंवा धरून ठेवते असा माझा विश्वास आहे.

कविता लिहायला लागल्यापासून आजपर्यंतच्या कविता चाळल्या तर माझ्या अभिव्यक्तीच्या मर्यादा मला पुरेपूर दिसून येतात. माझ्या बहुसंख्य कवितांतून प्रीती आणि निसर्ग यांनाच अभिव्यक्ती मिळाली आहे. निसर्ग-सुद्धा पुष्कळदा निसर्गासाठी आला नसून प्रीतीच्या अभिव्यक्तीसाठी आलेला आहे. प्रीतीच्या माधुरीपेक्षा तिची दाहकताच अधिक जाणवली आहे.

मी काही या दोनच अनुभूतींवर जगत नाही. इतर पुष्कळ अनुभवांतून मी जात असते. मुलांवरही मी प्रेम करते. जनावरांबद्दल मला अत्यंत जिव्हाळा वाटतो. घरात कुत्री, मांजरं असल्याशिवाय मला चैन पडत नाही. राजकारणात जरी मला समजत नसलं तरी त्या राजकारणानं शिक्षणक्षेत्रात जी अनवस्था केली आहे तिचा उद्वेगही वाटतो. अगतिक प्राथमिक शिक्षक-शिक्षिकांचं जीवन इतकं जवळून पाहायला मिळाल्यानं मन कसं सुन्न होऊन जातं. पण या साऱ्या अनुभवांना माझ्या कवितेत म्हणावं तितकं स्थान नाही. ही माझी आज तरी मर्यादा आहे.

पण मला वाटतं, यामुळं त्या परिमित अभिव्यक्तीला कमीपणा येण्याचं काहीच कारण नाही. अनुभूतींना अभिव्यक्त करणारे विशिष्ट 'एरियल्स' कवीच्या मनात उभे असावेत. हे जितके अधिक तितकी त्या कवीची प्रतिभा अधिक श्रेष्ठ, अधिक श्रीमंत. पण हे कवीच्या हातात नसतं. त्याच्या मनोधर्मानं ते 'एरियल्स' अगोदरच उभे करून ठेवलेले असतात. कवितेचं मूल्य कवितेच्या विषयात, आशयात नसून, तो विषय व तो आशय व्यक्त

करण्याच्या कवीच्या सामर्थ्यावर असतं. जी अनुभूती आपणाला व्यक्त करता येत नाही ती न केलेली बरी, असं माझं प्रामाणिक मत आहे. जी अनुभूती आपण साकार करू शकतो त्या अनुभूतीच्या कक्षांचा विस्तार करणं हे कवीच्या हातात आहे. नव्या सूक्ष्म अनुभूती, नव्या प्रतिमा जितक्या अधिक तितकं त्या कवीचं सर्वस्पर्शित्व अधिक. हे सर्वस्पर्शित्व वाढवणं हेच कवीचं कर्तव्य.

माझ्या भावजीवनात प्रीतीइतकंच निसर्गालाही स्थान आहे. निसर्गाची मला लहानपणापासूनच मनस्वी आवड आहे. लहानपणातील बरीच वर्षं खेडेगावात डोंगरदऱ्यांतून, शेताओहळांतून भटकण्यात गेल्यामुळं ही आवड निर्माण झाली असावी. आकाश, पाणी आणि वृक्ष यांचं मला फार आकर्षण आहे. त्याचप्रमाणं तळपणारं ऊन, धोधो पडणारा पाऊस, धुक्याच्या लाटा यांचंही. मला पुष्कळदा प्रवास आवडतो तो या साऱ्यांच्या दर्शनासाठीच. काश्मिरमधील भयचकित करणारी पर्वतराजी, खळखळणाऱ्या उन्मत्त नद्या, डहाणूचा भीषण वाटणारा वादळी समुद्र आणि मुंबईतील प्रसन्न समुद्र, खंडाळ्याच्या घाटाचं मनोज्ञ दर्शन, बंगळूरचं आकाश, आणि मदुरा-मीनाक्षीच्या वाटेवरील लाल माती, हिरवी शेतं यांचा माझ्या मनावर उत्कट ठसा उमटलेला आहे. सकाळी उठल्यावर पुढचं दार उघडताक्षणी, आकाश आणि वृक्षराजी यांचं दर्शन जर झालं नाही तर मला चुकल्यासारखं वाटतं. म्हणूनच माझ्या कवितेत निसर्गाला अधिक जागा असेल. पण हा निसर्ग नुसता वर्णनापुरता येत नाही—त्याच्या दर्शनानं माझ्या मनात जे रंगतरंग निर्माण केलेले असतात त्याच्या रूपात तो येतो. त्याला कारण असं—

काही विशिष्ट प्रकारची मनःस्थिती असेल तरच मी कवितेकडे वळते. माझ्या बाबतीत हा मनाचा ताण मनाच्या अस्वस्थतेतून निर्माण झालेला असतो आणि अस्वस्थपणा एकाकीपणाच्या जाणिवेतून निर्माण झालेला असतो.

माझ्या मनाचा स्वाभाविक कलच एकाकीपणाकडे झुकलेला आहे. एकाकीपणाची जाणीव असंख्य कारणांनी होत असते. आपल्याला हवं असलेलं पुस्तक वाचायला न मिळणं, भोवतालच्या माणसांच्या जीवनाची घडण असह्य होणं, घेतलेल्या कामात वा परिस्थितीत समरस होता न येणं,

जिव्हाळ्याच्या माणसांचा दुरावा जाणवणं यांनीदेखील ही एकाकीपणाची जाणीव सारखी मनात जागृत असते. कधीकधी आनंदाचे क्षणही या जाणिवेत डूब घेतात. आपलं मन आणि आपलं जीवन यात हे अंतर सारखं उभं राहातं. या अंतराच्या अवकाशात अस्वस्थता भरून राहाते आणि माझी काव्यशक्ती या अवकाशातील काही भावलहरी ध्वनित करू पाहाते. या अस्वस्थ अवस्थेत मला निसर्गाचं सान्निध्य फार हवं असतं, म्हणूनच त्या भावलहरी व्यक्त करताना निसर्गाच्या प्रतिमेतून व्यक्त होत असतील.

निसर्गाची जितकी मला आवड आहे तितकीच यंत्रं, गजबज, कारखाने यांची मला भीती आहे. यंत्राची नावड इतकी आहे की, रेडियो घरी आणल्यावर कित्येक दिवस मी तो स्वतःहून कधी लावला नाही. फोन करणं ही नित्याची गोष्ट आहे, पण मी ती शक्य तितकी टाळते. फोन करणं नि घेणं मला जमतच नाही. कारखान्यातील यंत्रांचा प्रचंड कारभार तर मी पाहूही शकत नाही—मी कधी त्या बाजूला फिरकतच नाही. गर्दीचं तर मला वावडंच आहे: इतकं की, गजबजलेल्या रस्त्यानं चालणं म्हणजे मला प्राणसंकट वाटतं.

यामुळंच की काय, आमच्या टिळकवाडीतील घरापासून वडगावच्या माझ्या नोकरीच्या ठिकाणापर्यंतचा रस्ता माझ्या भावजीवनात सध्या तरी महत्त्व घेऊन बसला आहे. माझ्या कित्येक कवितांना त्या रस्त्यानंच आकार दिला आहे म्हणायला हरकत नाही. ज्या ज्या माझ्या अतिशय लाडक्या गोष्टी आहेत त्यांत तो एक आहे.

खानापूर-रस्त्यानं टिळकवाडीची सीमा रेखली आहे. या सीमेपाशीच या रस्त्याचं प्रवेशद्वार आहे. अगदी त्याला शोभण्याजोगं. दोन प्रचंड वृक्षांची कमान त्या रस्त्यानं जाणाऱ्याचं स्वागत करायला अखंड उभी आहे. हा रस्ता तिथून उगवतीच्या दिशेनं एका लहानशा टेकडीवरून रांगत गेला आहे. या रस्त्याच्या दोन्ही बाजूला विस्तीर्ण माळ पसरला आहे. डाव्या क्षितिजाला बेळगाव शहराची झाडीतून दिसणारी किनार आहे, तर उजव्या क्षितिजाशी मोरपंखी डोंगरांच्या रांगा आहेत. चढतीच्या टोकाशी एक मोठं पावसाळी तळंही आहे. त्याच्या जरा दूरवर एक मारुतीचं देऊळ आहे. एक मोठा वृक्ष आणि त्याच्या शेजारचं हे घुमट असलेलं मंदिर मोठं रम्य दिसतं.

मंदिराला घुमट आहे म्हणून त्या सर्व माळाला कुणीतरी घुमटमाळ हे नाव दिलं आहे. त्या रस्त्याला नावच नाही. घुमटमाळातच तो विलीन होऊन गेला आहे. जिथं उतार संपतो तिथं आंब्याफणसांच्या झाडांतून आणि कळकांच्या बेटांतून वडगावाची चाहूल लागते आणि तो रस्ता संपतो.

अशा त्या रस्त्यानं मी रोजरोज चालत जात असते. कोणत्याही ऋतूत आणि कोणत्याही वेळी. कधी भर उन्हात तळपत, तर कधी भर पावसात निथळत; कधी धुक्यातून लपेटत, तर कधी वावटळीतून फरफटत.

त्या रस्त्याला लागलं की एक गंमत होते. घर आणि घरच्या गोष्टी मागच्या मागं राहातात. नोकरी आणि तिची कामं पुढच्या पुढं दिसेनाशी होतात. मध्ये उरते ती फक्त मी. एकसंध अशा मनाची मी. आणि माझ्या-भोवती तो माळ, ती शेतं, ते तळं, ते आभाळ, ती पाखरं, ते डोंगर—आणि या सर्वांचा लाडका असा तो रस्ता. त्या रस्त्यावर पाऊल टाकलं की तो रस्ता मला आपल्याच विश्वात घेऊन जातो.

त्या रस्त्यावर जसा माझा जीव जडला, तसा त्या तळ्याकाठच्या दगडावर, विजेच्या तारांवर, त्या शेतावरील बांधावर—सगळ्यावरच जडला. ते सगळंच माझं झालं. त्या सगळ्यालाच माझ्या भावजीवनात प्रवेश मिळाला.

हिवाळ्यात अगदी क्षितिजापर्यंत धुक्याचा दूधसागर. त्यात मधूनमधून डुंबत राहिलेली झाडं, ती सूर्याची वृक्षराजीतून येणारी किरणं—यांनीच मला 'शेला' ही कविता गुंफायला लावली. कधीकधी तर हे धुकं असं रस्त्यावर रांगत यायचं—कितीदा मी ते आपल्या पायाशी येऊन पोचेपर्यंत थांबलं आहे. त्या दर्शनानं मी भारावले आहे आणि तो क्षण एका कवितेत जपून ठेवला आहे. 'निघावयाचे कामासाठी' ही ती कविता. त्या शेतातील बांधावरून चालतानाच 'मेंदी' या कवितेत रंग भरला गेला आहे. 'धावत हट्टी वारा अडवा' तो याच रस्त्यावरचा. आणि हिरवं काजळ डोळ्यांत चढल्यावर दिसणारा दगड तोही इथलाच.

माझ्या कवितांत ज्या निसर्गाच्या प्रतिमा वैपुल्यानं दिसतात त्याला कारण हे माझं निसर्गाचं वेडच आहे. ज्या ज्या कवितेत तो भावक्षण आणि निसर्ग यांचं रसायन सुंदर जमलं आहे ती ती कविता वाचताना मला अजून अस्वस्थ

वाटतं इतकी ती माझ्या दृष्टीनं उत्कट झाली आहे. ‘ऐक जरा ना’ ही अशा कवितांपैकी एक.

चार संग्रह प्रसिद्ध होण्याइतक्या मी कविता लिहिल्या. पण कोणतीही कविता लिहिल्यावर लगेच कुणाला वाचून दाखवली नाही. मला ते जमत नाही. थोडीशी भीती, थोडासा संकोच—असं काहीतरी वाटतं. कविता वाचून न दाखवता वही हातात द्यायची ही माझी रीत.

असं असलं तरी मी माझी पहिली कविता वाचली ती मुंबईच्या ‘आकाशवाणी’वरून. १९४३ साली मुंबई ‘आकाशवाणी’नं एक कविसंमेलन भरवलं होतं, त्यात एक कविता वाचण्यासाठी मला निमंत्रण होतं. रेडियोचं निमंत्रण होतं—आणि म्हणूनच मी ते स्वीकारलं. त्या वेळच्या माझ्या जीवनात रेडियो हे दूरचं कौतुक होतं. रेडियोस्टेशनही त्यापूर्वी मी एकदाच पाहिलं होतं. तिथला तो झगझगाट, लाकडी सामानाचा रंगीत थाट, अधिकारी मंडळींचा दिमाख आणि कलावंतांची कलंदर वेषभूषेतील वर्दळ—ही सगळी मला यक्षनगरीची आठवण करून द्यायची. या यक्षनगरीत मला दोन मिनिटं प्रवेश मिळण्याची संधी मी कशी दवडणार ?

आमंत्रण स्वीकारलं आणि मोठं दिव्य समोर येऊन उभं राहिलं. कविता वाचायची कोणती ? आणि वाचायची कशी ? मी बरीच काव्यगायनं ऐकली असल्याकारणानं, यादीतील कवी कोणत्या कविता म्हणतील याची मला कल्पना होतीच. म्हणून मी त्याहून अगदी वेगळी अशी कविता निवडली. कवितेचं नाव होतं ‘अवखळ’. नेहमी दांडगाई करणाऱ्या खोडकर मुलाच्या आईच्या भावना त्यात होत्या. कविता रचली होती ‘भूपती’ मध्ये. पण मी ती कविता वाचायची ठरविली.

अवसान तर खूप आणलं होतं. पण ज्या दिवशी मी कवितावाचनासाठी त्या यक्षनगरीत अवतरले, तेव्हा मात्र खूपच घाबरले. आणि त्या थंड दालनांतून जाताना तर जमिनीवरचे पाय सुटल्यासारखे व्हायला लागले. ज्यांनी काव्यगायनाचं युग निर्माण केलं होतं ते श्री० यशवंतराव समोर होते. आणखी खूप मोठे मोठे कवी होते. आणि मी आता यांच्यासमोर माझी ती

कसलीतरी कविता वाचणार होते. माझी सगळी तयारी विरघळून गेली. प्रथम रंगीत तालीम होती. पायाशी तारांची वेटोळी चाळवीत उभ्या असलेल्या त्या उंचच उंच यंत्रासमोरही उभी राहिले. त्याचा तो कान जसा खाली खाली यायला लागला तसा मला घामच सुटला. मी कविता वाचून कधी संपवली ती मला कळलीच नाही. श्री० नगरकरांचं मोठ्या आर्जवी भाषेतील वाक्य मात्र ऐकू आलं.

"इंदिराबाई, जरा मोठ्यानं आणि सावकाश वाचा. आपण पुन्हा एकदा घेऊ या हं."

मी कविता पुन्हा वाचली, पण त्यांचं समाधान झालं नाही. पण मला दिला तेवढा वेळ पुरे होता. पण ज्यावेळी कार्यक्रमात मी ती कविता वाचली तेव्हा अगदी जशी वाचायची तशीच वाचली आणि संचालकांनी अभिप्राय दिला, "उगीच घाबरलात. फार छान वाचलंत."

त्यानंतर मी वारंवार कवितावाचन केलं आहे. कधी रेडियोवर तर कधी इतर कार्यक्रमांत. वारंवार कविता वाचीत गेल्यामुळं थोडासा आत्मविश्वास आला आहे. भावकवितेत जो भाव असतो त्याची ओळीओळीतून स्वतःचीच अशी एक लय बांधलेली असते. ही जाणीव ठेऊन जर कविता वाचली तर ज्याला काव्यास्वाद घ्यायचा आहे तो श्रोता त्या वाचनातून तो सहज घेऊ शकतो ही समज आली आहे.

माझं नाव जरी कवितावाचनाच्या कार्यक्रमांतून वारंवार येत असलं तरी ते माझ्या कवितेच्या किंवा कवितावाचनाच्या लोकप्रियतेचं गमक आहे असं मी म्हणू शकत नाही. सर्वसामान्य लोकांच्या भावनांना स्पर्श करण्याचं सामर्थ्य ज्याप्रमाणं माझ्या कवितेत नाही, त्याप्रमाणं ते माझ्या वाचनातही नाही. माझ्या कवितेची लोकप्रियता ही विशिष्ट लोकांपुरतीच आहे. तीच गोष्ट माझ्या कवितावाचनाची. त्यामुळं काव्यवाचनामुळं माझी कविता अधिक लोकप्रिय होण्याचं मला भय नाही.

कविता ही वाचून दाखविण्यापेक्षा वाचणंच मला अधिक चांगलं वाटतं. जी भावगीतं असतात त्यांत अर्थाबरोबर सुरांचा साजही गृहीत धरलेला

असल्यानं ती वाचण्यापेक्षा ऐकण्यानंच अधिक आनंद होतो. सर्वसाधारण-पणं बहिर्मुख अशी जी कविता असते ती वाचण्यानं किंवा गाण्यानं अधिक खुलते. पण अंतर्मुख असणाऱ्या भावकवितेला स्वरांची गरज नसते— उच्चारांची गरज नसते. भावकविता मोठ्यांदा वाचली की बटबटीत वाटू लागते. ती मनातच वाचायची असते.

कवितेचं वाचन आणि इतर ललित साहित्याचं वाचन यात मी वेगळेपण मानीत आले आहे. कुकर शिजत लावून एखादी कथा वाचून पूर्ण करता येते किंवा दुपारी लोळता लोळता कादंबरी वाचून बाजूला करता येते. वांचून संपलं की लगेच पुस्तकाबरोबर मनातील तरंगही दूर होतात. कवितेच्या बाबतीत मला असं करणं आवडत नाही. केवळ मनरंजनापेक्षाही काव्यात आणखी काहीतरी सामावलेलं असतं—आणि त्याचा आस्वाद घ्यायचा असेल तर कविता वाचताना वातावरण अगदी शांतनिर्वेध असावं आणि मनही तितकंच निर्वेध असावं, असं मला वाटतं. म्हणून मासिकातील किंवा कविता-संग्रहातील कविता वाचताना त्या मी रात्रीच वाचणं अधिक पसंत करते. सर्वांची निजानीज झाल्यावर शांत अशा वातावरणात उशागतीचा दिवा लावावा आणि पुस्तक उघडावं. बाहेरच्या शांतधूसर आकाशाचाच एक भाग अशा त्या खोलीत मग कविता वाचायला मला आवडते. काव्याबद्दलच्या गाढ आवडीमुळंच मला हे सोपस्कार करावेसे वाटत असतील.

अमूकच कवीच्या कविता वाचायच्या, बाकीच्यांच्या सोडून द्यायच्या, असं मी करीत नाही. प्रत्येक कविता मी वाचते. कवितेतून अर्थ निघालाच पाहिजे असाही माझा अट्टाहास नसतो. तकलुपी कविता आणि खरी कविता सहज ओळखता येते. मुद्दाम दुर्बोध केलेल्या कविताही लगेच ओळखता येतात. जी कविता कवीच्या प्रामाणिक प्रयत्नानंतरही दुर्बोध वाटते तीही ओळखता येते. अशा कवितेचा मला पुन्हा अभ्यास करावा असं वाटतं. ती कळली नाही तरी मी निराश होत नाही— किंवा मी त्या कवितेला नावंही ठेवत नाही. कित्येक भावलहरी शब्दांकित करणं जसं कठीण असतं तसं त्या ग्रहण करणंही कठीण असतं. कवीच्या आणि वाचकाच्या या उणेपणा-मुळंही कविता दुर्बोध लिहिली जाते किंवा समजली जाते, असं मला वाटतं.

कविता कशी वाचावी याबद्दल माझी एक साधी आवडती कल्पना आहे. तळ्याच्या किंवा नदीच्या काठावरून आपण पाण्यात शिरतो. पाण्याच्या स्पर्शाचा आनंद घेतघेतच आपण पुढंपुढं जातो. कमरेपर्यंत पाणी आलं की हातांनी पाण्याशी खेळतो—आणि गळ्यापर्यंत पुढं जाता जाता आपण पोहण्यासाठी पाण्याच्या स्वाधीन होतो. कवितेतदेखील असं उतरावं लागतं. तरच कवितेचा खरा आस्वाद आपणाला घेता येतो.

मी कशी कविता वाचते हे सांगितलं. तसंच माझी कविता वाचणारा वाचक कसा असावा याच्याही माझ्या काही अपेक्षा आहेत.

ज्याला काव्याची गोडी आहे त्यालाच माझी कविता आवडेल. वाचकाचं मन प्रगल्भ आणि संस्कारित असलं पाहिजे, तसंच ते सूक्ष्म संवेदना ग्रहण करण्याइतकं तरल असलं पाहिजे. कवीनं ज्या प्रतिमांतून एखादी भावलहरी शब्दांकित केलेली असते—ती भावलहरी अशा वाचकालाच पुनःप्रत्ययाचा आनंद देऊ शकते. पण पुनःप्रत्ययाचा आनंद हे एवढंच कवितेचं कार्य नव्हे. कवितेतील जिवंत प्रतिमांतून वाचकाच्या मनातही त्याच्या संस्कारा-प्रमाणं वा त्याच्या संवेदनाशील रसज्ञतेमुळं पुन्हा नानाविध तरंग उमटतात. सतारीच्या मुख्य तारांवरून बोट फिरलं की खालील तारांना कंपना येते, त्याप्रमाणंच हे होत असावं. या एकूण कंपनांचा आनंद लुटणं म्हणजेच काव्यास्वाद. म्हणजे केवळ कवितेचा आशय (अर्थ) समजून घेण्यात समाधान मानणाऱ्या वाचकापेक्षा मला असा वाचक अधिक रसज्ञ वाटतो. अशा वाचकानं माझ्या कवितेविषयी मला काही सांगावं अशी मला नेहमीच आवड असते.

पण असा अंतर्मुख, प्रगल्भ वाचक कविता वाचली रे वाचली की लगेच कळवत नाही—त्याला ते जमत नाही. म्हणूनच मला सहसा कुणाचं माझ्या कवितेविषयी मत कळत नाही. पण वाचकाच्या मताचा माझ्या कवितेवर काही परिणाम होतो असं मात्र नाही. वाचकानं काही सांगितल्यामुळं मी कवितेत काही फेरबदल केला असं फारच क्वचित घडलं आहे.

माझे आतापर्यंत चार कवितासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. अर्थात त्यावर

टीकालेखन असं बरंच झालेलं असणार. पण ज्या एका विविक्षित क्षेत्रात मी वावरते त्यात साहित्याचा फारसा संपर्क नसल्यानं मला फारसं काही वाचायला मिळत नाही. माझ्या कवितेवर जे लिहिले गेले, आणि जे मी अत्यंत आदरानं अभ्यासिले असे दोनच लेख आहेत. एक श्री० वा० ल० कुळकर्णी यांचा, आणि दुसरा श्री० माधव आचवल यांचा. श्री० वा० ल० कुळकर्णी यांचा लेख बऱ्याच वर्षांपूर्वीचा आहे. त्यावेळी माझा 'शेला' हा एकच संग्रह प्रसिद्ध झाला होता. माझ्या कवितेला 'विशुद्ध भावकविते'च्या सदरात त्यांनी प्रथमच जमा केली. त्यांच्या लेखामुळं मला माझ्या कविते-विषयी आत्मविश्वास वाटू लागला. श्री० माधव आचवल यांच्या लेखामुळं मला माझ्या कविता पुन्हा एकदा वाचून अभ्यासाव्या असं वाटलं. माझ्या कवितेची वैशिष्ट्यं त्यांनी त्या लेखात सांगितली. कवितेवरील टीकालेख या दृष्टीनं तो मला फार अभ्यसनीय आणि आदर्श असा वाटला.

अशा जाणकार रसज्ञ वाचकांनी माझ्या कवितेला दाद दिलेली असल्या-मुळं म्हणा किंवा मला तो सोस नसल्यामुळं म्हणा, "आपल्या कवितेवर कुठं काय लिहून आलं आहे—कुठं कुणी काय म्हटलं आहे—" याचं मला फारसं कुतूहल नसतं. माझ्या कवितेची पहिली वाचक मी आणि दुसरा वाचक संपादक. त्यापुढं मी फारशी चौकशी करीत बसत नाही.

या प्रस्तावनालेखनाच्या निमित्तानं मी माझे चारही संग्रह पुन्हा वाचले, आणि मनात आलं : मी आणि माझी कविता—आमच्यात काही दुवा तर निश्चित असणार. तो कोणत्या प्रकारचा असेल ? वरवर पाहता माझी कविता माझ्याबरोबरच वाढली आहे. माझ्या सुखानं ती रंगली आहे. दुःखानं कोसळली आहे. प्रक्षोभानं अस्वस्थ झाली आहे. माझ्याबरोबरच तिलाही प्रौढपणा आला आहे. 'शेला'तील कविता अगदी कोवळी वाटते. 'मेंदी', 'मृगजळ', 'रंगबावरी' या संग्रहांतील कवितांना अनुभूतींचं, प्रकटीकर-णाचं वजन आलं आहे. अशी माझी कविता माझ्या भावनात्मक आयुष्याशी निगडित आहे. पण ती माझी सखी नव्हे किंवा माझी प्रतिकृतीही नव्हे. मग तिचंमाझं नातं काय ? मला एक उत्तर सुचतं :

जीवनातील स्वास्थ्यापेक्षा (कदाचित ते न मिळाल्यानं) संघर्षांवर माझी

श्रद्धा आहे. जगण्याचं सार्थक करणारं काही गवसणार असेल तर ते या संघर्षातूनच माणसाच्या हाती येत असतं. या संघर्षात व्यक्तिमत्त्वाच्या ज्या ठिणग्या उडतात, त्या ठिणग्यांचं मला जबरदस्त आकर्षण असावं, त्या ठिणग्यांनी घेतलेला आकृतिबंध म्हणजेच माझी कविता, असं मी म्हणते. असं गद्यात सांगण्यापेक्षा माझ्या एका कवितेतूनच मी माझ्या कवितेसंबंधी अधिक चांगल्या तऱ्हेनं सांगू शकेन. ती कविता ही—' आले मी '.

वर्षेतिल संध्येपरि
आलें मी आवरीत
रक्ताचा जाळ लाल
दुःखाची गडद लाट;

वर्षेतिल रात्रीपरि
आलें मी सावरीत
नयनांतिल अश्रु निळे
हृदयांतिल वीज-रक्त;

धगधगतें जीवन हें
धरुन असें ओंजळींत
आलें मी कुठुन कशी...
—आलें मी हेंच फक्त.

— इंदिरा संत

शोला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

# शेला

निर्मल निर्भर वातावरणीं
धुकें तरंगे धूसर धूसर;
झगमगते अन् नक्षी त्यावर
सोनेरी किरणांची सुंदर!

थंड गुलाबी कार्तिकांतला
हवाहवासा स्पर्श तयाचा;
सुगंध त्याला नाजुक मादक
नव्या उमलत्या बूचफुलांचा!

चारुदत्त हा कोण कोठुनी
अंगावरला फेकित शेला:
वसंतसेना वसुंधरेने
झेलुन तो हृदयाशीं धरला!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ........

## केव्हापासून ही

केव्हापासून ही लागे हुरहूर;
फुललें अंतर अवचित.

उगाच मी जातां पहाया दर्पणीं
तरळे नयनीं गोड हसें.

लागलें वाटाया सारें हें नवीन;
गुंगलें मन्मन नाविन्यांत.

नवीनच कांही मना उमगलें;
हळूच हसले पंचप्राण.

दिवसाच्या मनीं चांदणें दाटलें
मन भारावलें तसें माझें.

सूर्योदयापूर्वी नभ कोंदाटतें
आणिक हसतें त्याच वेळीं;

तसेंच हृदयीं कांहीसें दाटलें
तरीही वाटलें गोड कांही.

## आई

कळ्या माझ्या आनंदाच्या
साठविल्या माझ्याकडे
फुलवाया तुझ्यापुढे.

आसवें मी साठविलीं
पापणीच्या काठोकाठ
तुझ्यापाशी देण्या वाट.

ठरविलें मनापाशी
बोलायाचें कितीतरी
निजूनिया मांडीवरी.

किती लांब वाटे काळ:
आई, कधी भेटशील ?
जीव झाला उतावीळ !

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
वि:
नोंद दि:

## कुठे

केव्हापासून पाखरू
घालतसे गोड शिळा :
कुठे बोलावितें मला !

आडदांड येई वारा;
ओढी पदर धरून :
कुठे नेई बोलावून !

ढगाआडून चांदणी
पुढे येई, खुणा करी :
बोलावितें कोठे तरी !

येती सागराच्या लाटा,
आदळती पायांवरी :
बोलाविती कोठे परी !

अधीरून गेलें मन;
पंख राहे फुगवून :
कुठे जाणार उडून !

नका बाई करूं घाई;
जीव माझा भांबावला;
कुठे येऊं सांगा मला !

## कोठे खोल तळांत

कोठे खोल तळांत पूर्वस्मृतिचे ज्वालामुखी जागृत,
त्यांची साहुन आच नित्य मन हें आतूनिया पोळलें.
कांही जे पडदे तसेच उरले पृष्ठावरी नाजुक
सारूं दूर तयां; कसें सहन तें होईल मातें तरी !

सौख्यें जाति झराझरा झिरपुनी : त्यांचे चरे राहिले;
कांही खोल जिव्हाळिंही उतरले; त्यांच्या कळा दुःसह;
दावूं का विचकून ते ? सहत ना ती कल्पनाही मना;
जाते ओंबुन आरपार हृदया : तें शक्य नाही मला.

दुःखें कैक मनीं रुतून बसलीं, काट्यापरी टोचती,
येथे हें सलतें म्हणून कशि मी दावूं तया स्पर्शनें ?
जातां तो हळुवार स्पर्श करण्या होतात ज्या वेदना
दुःखाची पुनरुक्ति ती सहन ना होणार केव्हा मला !

माझी आण तुला, नको नजर तूं रोखूं अशी मन्मनीं :
तेथे तें कढतें रसायन तुझ्या आगील नेत्रीं जळ.

## माझी प्रीती

सुकुमार माझी प्रीत
    रानांतल्या फुलावाणी;
नको पाहूं तिच्याकडे
    रागेजल्या नयनांनी.

लाजरी ही माझी प्रीत
    लाजाळूच्या रोपाहून;
नको पाहूं वाट तिची :
    तूंच घेईं ओळखून !

मुग्ध मूक प्रीत माझी :
    निर्झराची झुळझुळ;
नको पाहूं उलगून
    अस्फुटसे तिचे बोल.

अल्लडशी प्रीत माझी :
    सर तिला पाखराची;
तुझ्या मनीं आढळली
    जागा तिला निवाऱ्याची.

## चाहूल

लागतां चाहूल तुझी रे राजसा
उदरीच्या हंसा सुकुमारा.

इथल्या सोनुल्या तुझ्या बाळमूर्ती
रंगतात चित्तीं नानाविध.

आनंदें नितांत मन हो बेभान :
अमोलिक क्षण वाटती ते.

अनंत शयन सुखवी न जीवा,
रुचे न विसावा काय बाळा ?

विश्वदर्शनाची अनिवार हौस
काय धरलीस अंतरांत ?

म्हणून सारखा चालविला चाळा
असा अचपळा उन्मादक ?

जेव्हा हा उन्माद जाई ओसरून
मन ये भरून औदास्याने.

कुसुमकोमल तुझें तें पाऊल
बाळा ठेवशील विश्वांत ज्या

नाही रे तें आता इंद्राचें उद्यान ;
भीषण भयाण उग्ररूप !

## ये रे, ये रे

ये रे, ये रे, चांदूमामा,
तुझा खोडकर भाचा
करीतसे केव्हाहून
हट्ट तुझ्या पंगतीचा.

चांदीच्या या ताटलींत
कालविला दहीभात;
हात त्याला लावीना रे:
तुझी पहातसे वाट.

ये रे, ये रे, चांदूमामा,
नको आता वेळ लावूं;
रुसलेल्या लाडक्याला
किती वेळ समजावूं?

बाळ आहे कडेवरी;
हातीं घेऊनियां ताट
किती वेळ वाट पाहूं
तुझी आता अंगणांत?

## दातकणी

छान मखमली पेटी:
हिरकण्या दोन पोटीं
टेविसी कां लपवून;
पाहसी कां बावरून!

तांबूसल्या नभावर
उमटली चंद्रकोर
टेवी सांज लपवून?
पाहसी कां बावरून!

उमलत्या कमळांत
परागांची लयलूट;
नभ जाई सुगंधून!
पाहसी कां बावरून!

निळें काचरंगी तळें;
शांत हंस तरंगले
कलकल आनंदून:
पाहसी कां बावरून!

इवल्याशा शिंपलींत
मोतीदाणे झळाळत;
रहाती का झाकळून:
पाहसी कां बावरून!

गवसली बाई चोरी;
चाळवणी पुरे करी;
हास बाई, हास झणीं,
पाहूं दे ग दातकणी.

# प्रतीक्षा

काचघरांतील घड्याळ सुंदर
धडधड करितें त्याचें अंतर;
अधीरतेने होउन आतुर
दारावरती लावुनि डोळे लक्षित केव्हाचे!

केव्हाची ही खुर्ची झुलती
उत्सुक देण्यास्तव विश्रांति;
श्रमपरिहारास्तव तत्पर ती
पसरुन बाहू शांतपणाने तिष्ठत केव्हाची!

मित्रांच्या गुजगोष्टी घेउनी
जाड पाकिटें आलीं दुरुनी;
शिणलीं मेजावरी बैसुनी
घेइल कोणी उचलुन केव्हा बघती वाटेला!

सरंजाम हा आंत चहाचा;
मेजावरती थाट तयाचा
संथपणाने उभा कधीचा;
मोहक अधिरे कटाक्ष फेकूनि शोधी कोणाला?

जरी झाकला, पात्रामधुनी
वाफेसंगें येइ उफाळुनी
खमंगसा हा वास धावुनि
आलें का कुणि पहावयाला घरभर दरवळला!

मंद गान हें तेलचुलीचें
भाव दावितें अधिरपणाचे;
अल्लड आधण वरती नाचे :
सळसळ करुनी वाकवाकुनी शोधित कोणाला?

# बाळ होता रंगला

बाळ होता रंगला खेळण्यांत
विटी-दांडूचा खेळ अंगणांत
तोच कोणी मार्गांत दिसे त्याला
खेळ टाकुनिया बाळ तो पळाला.

मूर्ति कोणा ती श्रांत शिक्षिकेची
चवड होती हातांतही वह्यांची
बालहृदयांचा करुनिया विकास
थकुन परते ती आपुल्या घरास.

आइ आली : आनंद फार झाला
बाळ जाउनिया बिलगला तियेला
भान खेळाचें उरलेंच त्यास नाही
पदर धरुनी तिजसवें आंत जाई.

बोलुं लागे लाडक्या गोड गोष्टी
मिठी घालुन कमरेस मूर्त छोटी
क्षीण हसुनी ती करित दूर त्याला
"दूर हो रे, जा कसा खेळण्याला."

भार हातांतिल दिला फेकुनीया
आणि लोटी मंचकीं श्रांत काया;
बाळ गेला रंगून खेळण्यांत
विटी-दांडूचा खेळ अंगणांत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना

# या हो सूर्यनारायणा

या हो सूर्यनारायणा,
या हो या लौकर :
सोन्याच्या पावलांनी
भूषवा हें घर.

अंगण सारवीलें;
रेखिलें स्वस्तिक
हळदीकुंकवानी
मंगलसूचक.

उघडीं दालनें हीं
स्वागता आतूर;
या हो सूर्यनारायणा,
या हो या लौकर.

आकाशमध्यभागीं
आलांत भास्करा;
तेजाच्या वर्षावांत
झगमगे धरा.

येऊं देत माझ्या घरीं
किरणांचे झोत :
तेजस्वी पित्याचे ते
वात्सल्याचे हात.

उघडीं तावदानें,
झरोके कौलारीं;
रेंगाळोत घरामाजी
किरणें रुपेरी.

सोन्याच्या वेशींतून
निरोप घेतांना
या हो या अंगणांत
सूर्यनारायणा.

आईच्या मायेहून
कोमल करांनी
गोंजारा बालकांना
खेळती अंगणीं.

रंगवा तावदान,
शिणलें अंतर;
गुलाबी आनंदांत
न्हाऊं दे संसार.

# गाई गाई

आली बघ गाई गाई
शेजारच्या अंगणांत;
फुललासे निशिगंध :
घोटाळली ताटव्यांत !

आली बघ गाई गाई :
चालविली किरकीर
आळवाया तिला का ग
दमलीस सुकुमार !

आली बघ गाई गाई :
चांदण्याचे पायीं चाळ;
लाविलें का अवधान
ऐकावया त्यांचा ताल !

आली बघ गाई गाई :
तुझ्या चांदोबाची वाळी;
न्याहाळाया तिला कां ग
पापणीही थिरावली !

आली बघ गाई गाई
लोचनांचे घेई पापे;
म्हणून का भारावले
डोळे माझ्या लाडकीचे !

आली बघ गाई गाई :
लावी करांगुली गालीं
म्हणून का हासलीस ?
उमटली गोड खळी !

खाली बघ गाई गाई :
    काढीतसे लांब झोका;
दमलीस खेळूनिया
    झाक मोतियाच्या शिंपा !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ......................
क्रमांक ........................ नोंद दि: ......................

## चिमुकलें डबकें

सरसर गेला पाउस येउनि :
जिकडेतिकडे झालें पाणी;
टपटप ठिबके पानामधुनी,
लोट चालले रस्त्यामधुनी;
लगबग जाती कुठे धावुनी :
घाई कसली—कुठे ओढणी !

मध्येच रस्त्यावरी एकलें
साचुन राही डबकें इवलें.
जणू खोडकर हट्टी बालक
तटुनी हटुनी राही नाहक.
रुचे न त्याला जाणे धावुन
आणिक मिळणें ओढ्यालागुन.

आस कोणती मनीं धरुनी
बसे इथे हें खिन्न होउनी ?
गढूळ झालें चिखल माखुनी;
गजबज करती चिलटें वरुनी;
कुणी पोरटीं जातां येतां
खडे फेकती त्यांत खेळतां;
कुणी न जाई त्याच्या जवळुन;
जातां घेती वस्त्र आवरुन,
तिरस्कारुनी त्याला बघती,
शी शी म्हणुनी कुणी थुंकती;

गर्वोद्धत कुणि मधेंच मोटर
भेदुनि जाई त्याचें अंतर.
कारंजीं चिखलाचीं उडती
शांत जलावर रंग तरंगती.

सर्व ताप हा घेई सोसुनि,
खिन्नपणाने राही बसुनी.

येउन वरुनी कोमल रविकर
उजळूं पाहे याचें अंतर;
येउनि वायूलहरी शीतल
हसवूं पाहे उदास पल्वल;
कुणी बालिका गोजिरवाणी
शुभ्र सोनुल्या नावा सोडुनि
त्याच्या संगें खेळूं पाहे;
परी कुणाला मुळी न मोहे.

हास्यछटा मुळि दिसे न वदनीं,
खिन्नपणाने राही बसुनी :
स्थितप्रज्ञ हा मुनी कुणितरी
घोर तपातें इथे आचरी.

कडक उन्हाच्या समयीं कोठुनि
श्वान तिथे ये जीव घेउनी :
केविलवाणें लूतभरू तें
मरणाला जणु सादच देतें!
अंतकाळची तहान त्याची
शमली तेथे दोन जिभांची

क्षणिक पल्वल क्षणिक उजळलें :
जणू तपाचें सार्थक झालें;
चमकुनि किंचित् रविच्या किरणीं
पहातां पहातां गेलें सुकुनी.

# आसवें

मैत्रीचें नातें होतें अपुलें जेव्हा
लागून ओढणी सहवासाची तेव्हा
मनिं दाटुन आल्या गोड भावना नाना
अन् एकांतीं मीं ढाळियलें अश्रूंना.
मग जलस्नात त्या फुलासारखें झालें
मन माझें ताजें प्रसन्नतेने भरलें.

मीं विवाहमाला तुझ्या घातली कंठीं;
मजकडे पाहसी स्वर्ग आणुनी नेत्रीं.
त्या गभीरमंगल समयीं डोळ्यांमधुनी
निखळलीं आसवें : भरलीं मांगल्यानी.
घट सौख्याशेचा हृदयीं आला भरुन :
जणु त्यांतिल आले उसळुनि बिंदू दोन.

अन् तेव्हापासुन कितीकदा नयनांत
साठलीं आसवें, ओघळलीं जोमांत.
जे आले अश्रू उसळुन आनंदाने
जाहली तयांचीं फुलें तुझ्या स्पर्शाने;
त्या अश्रुफुलांचा गंध जईं दरवळला
संसार भासला मधुसुमनांचा झेला !

मन गेलें केव्हा दुःखाने व्याकळुन;
असहायपणाने भरुनी आले नयन.
तव नजर बोलतां परी शांत गंभीर
हो इंद्रधनूपरि आर्त, पालटे नूर.

जीं तुझ्याचसाठीं आलीं अन् ओघळलीं,
स्पर्शानें तुझिया फुललीं, खुललीं, हसलीं,
तीं अता आसवें कुठे जाहलीं गुप्त
जीं ढाळुन व्हावें दग्ध चित्त हें शांत!

## कातरवेळेला

कातरवेळेला रिकाम्या दारांत
उभी मी रहात केव्हाहून.
श्रमित आतुर येशील हासत
ओढ ही मनांत वागते कां ?
येई थंडगार घेरून अंधार
आणखी अंतर गारठतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१५५६५


रेखीव निवांत रस्त्याचें वाकण;
वृक्षांची कमान दाट वरी.
त्याच वाटेला कां वळतें पाऊल :
लागते चाहूल काय तुझी.
नव्हे तें वाकण : दुधारी कट्यार;
भेदिते अंतर आरपार.

पदार्थ नाजूक तुझ्या आवडीचे
पाहूनिया काचे मन माझें.
नित्य नियमाने जातां चुलीपुढे
पडे जें साकडें सांगूं कोणा !

उघडतां केव्हा तुझे ते सन्मित्र :
ज्ञानियांचे ग्रंथ बहुमोल.
अधोरेखितें : त्या स्मृतीच्या शलाका
लाविती आग कां अंतराला.

तुजवीण आतां तुझ्या या संसारीं
अंगाराच्या सरी वर्षतात :
आंतबाहेरून लागलीसे आग;
तुझा घेत माग येऊं कोठे ?

## ही निळीपांढरी

ही निळीपांढरी शरदांतील दुपार :
तापल्या दुधापरि ऊन हिचें हळुवार;
दाटली साय की स्निग्ध शुभ्र आकाशीं
फिरतात तशा या शुभ्र ढगांच्या राशी.

त्या ऊन दुधाचे घुटके घेत खुशाल
सुस्तींत लोळतो खाली हिरवा माळ;
अन् बसल्या तेथे गायी करित रवंथ
वारीत शेपट्या, कोणी चरती संथ.

साचल्या तळ्याचें पाणी लालगढूळ;
उमटलें त्यामधे दुपारचें आभाळ.
ती झाडी उलटी : धुंद हलेना पान;
नजिकच्या पुलाची उलटी भव्य कमान.

लावून समाधी बसल्या त्याच तळ्यांत
जलविहार करण्या म्हशी किती धुंदींत;
कुणि परीट तेथे काळ्या दगडावरती
धूतसे : शब्द तो धुंद कोंदला भवती.

दोरीवर हाले कपड्यांची ती ओळ :
तरळते संथ ती बगळ्यांची का माळ ?
जवळीच लोळती कुणी गुराखी पोरें,
कुणि पतंग सोडुन खेचित होतीं दोरें,

कां अशी विलक्षण इथे पसरली धुंदी ?
कां प्रसन्नता ही सुंदपणें आनंदी ?
कां गोड जाड्य हें पसरे धरणीवरती ?
रेंगाळत कां हें सौख्य विलक्षण भवती ?

दिस भरलेली ही काय तरी गभीर
टाकीत पावलें चाले रम्य दुपार !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों० दि: ........

## झंझावात

तव आवडता बघ आला वर्षाकाळ :
किति कुंद गारठा, भरुनी येत अभाळ.
नाजूक झिमझिमे पाउस कौलांवरती;
मधुवर्षागानीं तन्मय होती वृत्ती.

शिरिं पाझरणारी घागर घेउन कोणी
लाजून उभी ही गौळण वाटे धरणी;
तो धुंद लाजरा ओला डौल पहात
बेभान जाहलों आपण येथ घरांत.

बाहेर गारठा; बंद घराचीं दारें :
किती ऊब सुखावह : धगधगतात निखारे;
अन् लपेटुनीया उनी कोट अंगाशीं
किति सुखकर वाटे बसणें खिडकीपाशी.

हे मधे ठेविले दोन चहाचे पेले :
चवदार तयांतिल वाफ उफाळून खेळे;
अन् तुझ्या करांतिल उंची शुभ्र सिगार
वलयांतुनि वितरे दर्प तिचा सुकुमार.

सैगलचें चाले गान करुणगंभीर
त्या वातावरणा आणित न्यारा नूर;
क्षणिं तोच कडाडे वीज किती जोरांत :
क्षणभरी लखलखे वसुधा अंधारांत.

अन् स्वप्नांतुन हें दचकुन उठतें चित्त :
तें स्वप्नच का हें स्वप्न पडावी भ्रांत.
नभ अवघें गेलें मेघांनी व्यापून;
चारीहि दिशांनी आलें अंधारून.

हा पिसाटापरी धावत वारा ओला :
खळ दुःशासन की झोंबतसे धरणीला.
भयभीत बिचारीं गुरेंपाखरें पळती;
त्या पाचोळ्याची कुणास ठावे नियती.

अन् थेंब टपोरे सर्पापरि ते थंड
वेगांत धावती फोडुन काळे खंड;
कडकडे वीज : मग उठे काय कल्लोळ;
मिळण्यास निघाला तया धुळीचा लोळ.

हीं अता घराचीं सताड उघडीं दारें;
बेफाम धावती उभे त्यांतुनी वारे :
तें पहात तांडव उभी राहतें येथ
दडपून मनांतिल मनांत झंझावात.

# उत्फुल्ल पीत हें

उत्फुल्ल पीत हें चंद्रबिंब हासरें
सरकलें वरी अन् झळाळलीं गोपुरें.
पसरलें धरेवर चंदेरी मोहन :
ये झोत रुपेरी माझ्या खिडकींतून.

भरुनिया चांदणें राहे या दालनीं
अन् वस्तूंवरुनी पसरे नव मोहिनी.
हा तलम रुपेरी पडदा दारीं खुले :
जणु चंद्रकरांचा झोतच येथे झुले.

मुम्ताज तशी ही मच्छरदाणी उभी;
मोतिया फुलांचा सुवास कोंदे नभीं;
या गजांगजांतुन वितरे जें चांदणें
उमटवी भिंतिवर बिंब किती देखणें.

जणु करावयातें युगुलाचें कौतुक
दे चंद्र आयना आम्हांला नाजुक :
लीलेंत राहुनी समोर याच्या किती
रेखिल्या आपुल्या आपण वदनाकृति.

त्या रेखाकृतिचें चाले नित कूजन
पाहून बोललों कितिदा तरि आपण :
जोवरी चंद्रमा हसेल नीलांबरीं,
जोवरी चांदणें येइल अभ्यंतरीं,

तोवरी चिरंतन आपण होऊं इथे;
हें प्रतीक अपुल्या प्रेमाचें बोलतें.
अजि जिना चढोनी जातां माडीवरी
कवडसा उभा तो दिसतो भिंतीवरी.

नजरेस लावुनी नजर तिथे बोलती
ज्या तुवां रेखिल्या सुरम्य रेखाकृति.
वेगांत जाउनी लावियलें दार मी;
बावरे जीव हा घोर अशा त्या तमीं.

कापुरापरी हें मनांतलें चांदणें
घेतसे पेट अन् असह्य होई जिणें.

## ठरवितें किती मी

ठरवितें किती मी यावें तुझियाकडे :
मन निघे घेउनी वाऱ्याचें रूपडें.
लगबगा निघोनी येतें दाराकडे
अन् पुढे सुचेना जावें कोणीकडे !

अंगणीं उभे हे किती तुझे सोबती,
'ही तुझ्या सख्याची वाट' मला सांगती :
हें निळें पाखरू म्हणतें, 'ये इकडुनी.'
दूर्वांकुर म्हणती, 'येई या बाजुनी.'

हें इंद्रधनू तर वरुनी मज बोलवी;
ही पाउसधारा हाताने पालवी;
हा समीर येउन कानाशीं लागतो,
'चल, तुझ्या सख्याची वाट तुला दावितों.'

हा चंद्रकिरण ये धरावया अंगुली
अन् निशा म्हणे, 'मम सोबत तुज चांगली.'
मज उत्साहाने न्याया तुझिया स्थळीं
किती स्नेहभराने जमली ही मंडळी.

मी सावरिलें मन, सावरला अंचल
अन् पुढे निघाया उचले हें पाउल—
अडखळे उंबरा—होउन काया लुळी
कोसळे खालती; कांही न कळे मुळी.

# एक क्षण

निर्जीव या जीवनांत
असा येतो एक क्षण :
बधीर हें माझें मन
पुन्हा घेई संजीवन.

पाहूं जातां भोवताली
आहे कोठे सुखरूप,
आहे कोठे माणुसकी,
जीवन घे काळरूप.

भीषण या जीवनांत
अणूपरी माझें दुःख;
काय त्याला कवटाळू
आणि भोगूं तेंच सुख.

माझें सुख, माझें दुःख :
लाडके हे माझे भाव;
काय त्यांचेंच कौतुक,
कोठवरी त्यांना वाव.

कां न जाणे पराचिये
अंतरीचें सुखदुःख;
कासया हें मन आता
राहूं पाहे अंतर्मुख.

निर्जीव या जीवनांत
असा येतो एक क्षण
आणि बधीर हें मन
पुन्हा घेई संजीवन

# सांडगे

निळ्या मलमलीतुनी गाळुनी ग्रीष्माचें ये उन:
जरी कोवळें प्रहरभराचें दे चटका तापुन.
कुणीं पसरली तदा अंगणीं शुभ्र अशी मलमल;
थयथय नाचे ग्रीष्म तियेवर उचलित किरणावळ.

चमचा-वाटी घेउन हातीं कुणी तिथे बालिका
घालि सांडगे रुंद्ट गोलट: शुभ्रांबरिं तारका;
सतेज निळसर ठिपके, नाजुक खसखस नक्षीवरी,
एक हारिने वस्त्रावरती ठेवितसे सुंदरी.

नव्या वधूचा साज: कंकणें, साडी हिरवी तिची;
शोभा वदनीं, मदिरा नयनीं, चमके नवलाइची.
ऊन तापतें जरी वरोनी, भान न तिजला मुळी,
लालबुंद जरि तिची जाहली वदनकळी कोवळी.

"येतिल सुकुनी उद्या सांडगे, घालिन तळणीवरी;
सरसर येतिल वरी फुलोनी: रास फुलांची खरी.
स्पर्श किती अलवार, वासही खमंग अन् साजुक;
सेवुन त्यांना, धनी जिवाचा करील किति कौतुक!"

या स्वप्नाचा शीतल वारा खेळतसे अंतरीं,
या स्वप्नाचा सुगंध मादक भान तियेचें हरी
भाल टिपोनी, मधुर हासुनी वरी तिने पाहिलें:
ऊन कोठलें, टपटपलीं तीं धवल जुईचीं फुलें.

# अडखळे

अडखळे लिहितांना
हात कधी अवचित
आणि निरखून डोळे
पहातात अक्षरांत :

कानावेलांटीचा डौल,
मोड तशी अक्षराची,
कधी द्यावी कधी नाही
रेघ अक्षरावरची !

नकळत उमटली
कुणाची ही काय तऱ्हा :
इवल्याशा रेषेमाजी
भावजीवनाचा झरा !

नव्हेतच अक्षरें हीं :
स्मृतिसुमनांचे झेले;
एकाएका अक्षरांत
भावगंध दरवळे !

म्हणूनीच लिहितांना
अवचित थांबे हात;
धुकें तसें आसवांचें
उभें राही लोचनांत !

# खुणा

लाल मऊ धुळींतील
        उमटली खूण खूण :
माझ्या अंतरींचा ठेवा
        पहा गडे न्याहळून.

बघ इथे उमटलीं
        चाकें कशीं दुचाकीचीं;
नक्षी किती सुकुमार
        किनारच पातळाची.

बाळ कोणी धावलासे
        ओढ लागून घराची;
इथे पाउलें गोजिरीं
        बघ दुडक्या चालीचीं.

इथे कोणा प्रेमिकांची
        जोडी जाई बिलगून;
उमटली लगोलग
        बुटाचपलांची खूण.

गेला कोणी अधिकारी
        ठसवोनी अधिकार;
बुटांतील खिळे त्याच्या
        उमटले सुकुमार.

शेळ्यामेंढ्यांचा कळप
        आला बघ घसावसा;
गोजिऱ्या त्या पावलांचा
        साठवावा कसा ठसा.

सरसर आलीं पानें,
फेर धरून नाचलीं;
नाजूक ही त्यांची खूण
किती जपून ठेवली.

गजबजे अंतर हें
अशा लोभस खुणांनी;
येते परी एक वेळ
जाती साऱ्या या पुसोनी.

आणि अंतरावरून
जाई अंधाराचा लोळ;
बसे तया न्याहाळीत
क्षीण दीपिकांची ओल.

होऊनिया एकतान
आभाळही वरतूनी
कोरी बुजलेल्या खुणा
चांदण्यांच्या टाचण्यांनी.

लाल मऊ धुळींतील
उमटली खूण खूण :
माझ्या अंतरींचा ठेवा
पहा गडे न्याहाळून.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.......................... दिः ....................
क्रमांक .......................... नोंद दिः....................

## वाटे मला

ओथंबले मेंदीघोस :
त्यांच्या परागाची उटी
लेऊनिया मंद मंद
येई झुळूक गोरटी !

फुलें पारिजातकाचीं
ओघळती हळूवार :
गंध त्यांचा झेलूनिया
समीर ये सुकुमार !

मंद शीत सुगंधित
येती झोत माझ्यापाशी :
येऊनिया बिलगती
लाडकीं हीं बाळें कशीं.

कठोर हें मन परी
तोडी त्यांचा स्नेहपाश;
ओढ जीवा वेगळीच,
वेगळाच त्याचा ध्यास.

सागराचा खारा वारा,
गंध त्याचा आगी धुंद;
वादळाची ओढ त्याची,
स्पर्श ओलसर सुंद.

आभाळ हो काळेंभोर,
चहूकडे धूळ ! धूळ !
बेफाम हा धावे वारा,
सुटे सागराचा तोल.

घुसमटे श्वास; जाई
देह-दूकुलाचें भान;
वाटे मला आता व्हावें
त्याच वादळास्वाधीन.

# कधि जीवन वाटे

कधि जीवन वाटे वाळवंट वैराण
वा दावाग्नीने घेरियलेलें रान :
होऊन सहन ना हृदयांतिल काहूर
मी निघूं पाहतें कुठे...कुठे तरि दूर.

किरमिजी धुळीचा रस्ता रुंद निवांत
सुखवितो पावलां स्पर्शें शीतल शांत;
बिलगती तयाला भातखाचरें हिरवीं :
ती सळसळणारी लक्ष्मी नयना भुलवी.

मधुनीच उभे हे उंच खांब तारेचे
सुखदुःख घुमावें ज्यामधुनी विश्वाचें;
ती जरा पलिकडे धडधड करते गिरणी :
लयबद्ध नाद तो भरतो वातावरणीं.

ऐकून चित्तही करि त्याचा अनुवाद :
जणु यंत्रचि देतें यंत्राला पडसाद !
त्या चिमणीमधुनी निघे धुराची ओळ;
तो गंध विलक्षण करी जिवा व्याकूळ.

या दुसऱ्या बाजुस उंचवटा खडकाळ
त्यावरुनी जाती आगगाडिचे रूळ :
जातेच नागिणी क्षणांत फोफावोनी,
सोडते उसासे भरलेले ठिणग्यांनी.

थरथरती शेतें, रानपाखरें चिमणीं
अन् क्षणांत होतें स्तब्धचि वातावरणीं.
संपूंच नये ही रम्य गोजिरी वाट;
संपूंच नये हें गंधित हिरवें शेत.

हे रूळ भेदुनी जाऊं देत सिमेला
अन् खांबांचीही अखंड राहो माला;
तारेंत घुमूं दे विश्वमनींचें आर्त;
चालूं दे गिरणी अशीच एकलयींत.

त्या ठिणग्या चमकत काळ्या गाढ धुरांत
रेंगाळत माझ्या मागुनिया येवोत.
हें पहात सारें शून्य मनें चालावें;
पावलामागुनी पाउल हें उचलावें.

## नाल

रस्त्याकाठीं प्रचंड पिंपळ :
पानांची अव्याहत सळसळ;
गडद पोपटी हिरवट काळीं
पिंपळपानें लाल कोवळीं
ऐन दुपारीं झगमग करती
जललहरींचा भास निर्मिती.
त्या पानांचा दाट पिसारा;
त्यांतुन झरती प्रकाशधारा
शोषुन शीतलता रंगाची
कोमलता अन् पर्णांतरिंची.

चिरप्रवासी सडक खालती :
रुक्ष विरागी धूळभरू ती.
तीहि लोभली त्याला पाहुन;
घेई वळसा जाई जवळुन.
आणिक येथे कसली दाटी
पिंपळाचिया पाशवरती ?
जमले येथे कशास खेडुत ?
काय चालले असेल येथ ?

दिसे बघा या दाटीमधुनी
बैल पाडला अडवा धरुनी :
कुणी बैसले धरुनी वेसण,
कुणी ठेविलीं शिंगें दाबुन,

पाय टाकले बांधुन त्याचे,
पोट दिसे वर दुबळें साचें.
पडलें तें असहाय जनावर;
नाकांतुन ये स्वर किति कातर.

नालबंद अन् नाल काढतो
लोखंडी चकचकित नवा तो;
खिळे-हतोडा घेइ खुशाल
आणिक ठोकी खुरास नाल.
जातांयेतां कधी तेथुनी
गळयांत येतें कांही दाटुनि;
नजर ठरेना त्या दृश्यावर;
कुठेतरी भिरभिरतें अंतर.

वाटचाल ती पुढची दुस्तर
सुसह्य व्हावी म्हणुन इथे तर
नाल खुरांना घेती ठोकुन...
नाल खुरांना घेती ठोकुन.

...ाही ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
...

## तुझ्या घराला

तुझ्या घराला वाट जातसे पांदींपांदींतुनी;
नाजुक वेलीवरी लगडल्या गुंजा दो बाजुंनी.
लवली जागोजाग सुमांगी सेंदी काठावरी
तशी बाभळी, शुभ्र ओढणी काटेरी सावरी.

उंच जांभळा डोंगर शोभे सुनील क्षितिजावर;
हिरवट काळें रान तळाशीं, दिसे जरा धूसर.
शिळा घालती रानपाखरें, वारा करि सळसळ;
भवताली तर शांती दाटे गभीर अन् कोमल.

तिथेच आहे तुझें चिमुकलें गवताचें झोपडें;
काळेंबाळें तिथे कोकरूं दाराशीं बागडे.
दाराशीं तूं उभी : नेसुचें लुगडें गुंजेपरी
लालभडक अन् तंग नेसणी तशीच गुडघ्यावरी.

उभार उघडी; नुसती चोळी तारुण्या सावरी;
लाल मण्यांच्या गळ्यांत पोती; मधे रुप्याची सरी.
साध्याभोळ्या नयनीं नाचे निर्भयता हासरी;
हसें कोवळें अर्भकापरी : भान मनाचें हरी.

नागर नीती शिकवाया तुज आलें तुझियाकडे :
सौंदर्याच्या शांत जलाशयिं टाकावे कां खडे ?

# होउन माझ्यांतून निराळी

होउन माझ्यांतून निराळी
मीच घेतसें रूप निराळें;
तुझ्या संगती सदा राहतें,
अनुभवितें तें सुखचि आगळें!

तुझ्यासवे मी विहरत फिरतें
चंचल संध्यारंगांमधुनी;
तुझ्यासवें अंगावर घेतें
नक्षत्रांचें गुलाबपाणी!

चंद्रास्ताची विव्हल शोभा :
भाव मनींचे आर्त नि कोमल
अनुभवितांना उत्कटतेने
तुझ्यासवे मी होतें निश्चल!

हळू नि अस्फुट तुझें बोलणें
ऐकत बसतें होउन तल्लिन;
ठेउन देतें हृदयसंपुटीं
जसा साठवी गंध समीरण!

आणि बिलगुनी तशीच बसतें,
तुला पाहतें डोळे भरुनी;
डोळे भरुनी तुला पाहतां
खरेंच यावे जेही भरुनी!

—परंतु जग हें किती निराळें,
नव्हेच माझें, किती निराळें!

# अवचित

अवचित कोठेतरी
डोळे तुझे भेटतात;
कोसळून वीजलोळ
हृदयाचा तोल जात !

अवचित कोठे तरी
तुझी उंच अंगलट
दिसे, आणि जाई कशी
सुरी आंतड्यांत नीट !

अवचित कोठे तरी
स्वर तुझा येई कानीं;
विरघळे शरीर हें
मन जाई बधीरुनी !

अवचित कोठे तरी
तुझ्या लकबीचा भास;
येई डोळ्यापुढे काळें
आणि होई कासावीस !

अवचित कोठे तरी
असें कांही आढळतें;
कोरड्या या लोचनांत
आग उगाच जळते !

## स्वाधीन

काळी करारी भुवई :
	चढी कमान पौरुषाची;
काळी मादक किनार
	भावगंभीर पापणीची !

आडकलें, गुंतलें मी
	कमानींत, किनारींत;
कोसळलें तेथुनिया
	मदिरेच्या सागरांत !

तळीं चौदाही रत्नांनी
	मज घेतलें झेलून
आणि तेव्हापासूनिया
	झालें तुझ्या मी स्वाधीन !

# नक्षत्रफुलें

क्षणफुलें वाहुनी केलें तव पूजन :
त्या निर्माल्याची उदंड ही पखरण.
निर्माल्य जरी हा वास न सरला कसा;
रसरशित पाकळीवरल्या तांबुस नसा.

तीं फुलें वेचतें आता वेड्यापरी
अन् साठवितें तीं अंगाराच्या उरीं :
लागून आच तीं रूपच घेतीं नवें;
पाहून तयांना हसलीं हीं आसवें.

नक्षत्रफुलें तीं आता तुज वाहुन
मी चालवितें तव अखंड हें पूजन.

# सागरा

ऐकून सागरा, गान भावगंभीर,
तव सहवासाला होउनिया आतूर,
जांभळ्या फुलांचा लेवुनिया शिणगार
तिष्ठते इथे ही सागरवेल अधीर !

जे तुषार येतिल कधी तुझ्या लहरींने
त्यांनीच होत ही पुलकित आनंदाने;
रसरसुनी येतें हिचें देखणें रूप;
तव ध्यास घेउनी उभी इथे अश्राप !

मोहिनी पडोनी तुझ्या भव्य रूपाची
ही उभी नारळी इथे असे केव्हाची :
सावळी कृशांगी, सुधाकुंभ घेऊन
सागरा, पाहते वाट तुझी हरखून !

तूं दूर; परी रे, तुझिया निश्वसितांनी
ही फुलून गेली अवघी रोमांचांनी
थरथरे तनूमन गोड भाव उसळून
अन् वाट पाहते होउनिया बेभान !

सागरा, घेउनी ओढ तुझ्या सहवासीं
ही सिकता झाली तुझ्या पदाची दासी;
साहून ग्रीष्म अन् वर्षा आनंदाने
पसरून बाहु ही उभी इथे भक्तीने !

लांवून कधीतरि फेकतोस नजराणा :
ते शंखशिंपले : मोलाचाच खजीना
निरखिते सारखी; झाला तोच विसावा !
अन् अक्षय चाले तुझा अंतरीं धावा !

या मुग्ध जिवांचे भाव गाढ हळुवार
सागरा, तुला का कधी तरी कळणार ?

## निघतांना

निघतांना, सरकेना
        पाय कसा चपलेंत
आणि गंधवालावरी
        हात कसा रेंगाळत !

नजर ही खोडकर
        जड झाली पापणीला;
ओठ उगाच शोधिती
        कांहीतरी बोलायला !

हालचालींने या तुझ्या
        हाले माझा पारिजात :
मोतीपोवळ्यांची रास
        पायाखाली ओसंडत !

## कलावंतिणीचा वेल

कलावंतिणीचा वेल
विस्तारला दारावरी;
डोळे काय ठरतील
लालबुंद गेंदावरी !

उभी त्याच वेलीखाली
पाठमोरी कोणीतरी :
सुरंगीचा वळेसर
कृष्णकेशभारावरी !

डाळिंबीच्या फुलापरी
साडी लाल डौलदार;
निळ्या गर्द किनारीची
नागमोड मनोहर !

अर्धउघड्या पोटऱ्या
केवड्याच्या कणसाच्या;
काळ्याशार सपातांत
टाचा लाल कमळाच्या !

पाहूनिया रंग रंग
चाले रेंगाळत ऊन;
रंगेलही गुल्मोहर
उभा कसा बेहोषून !

## तुझ्या वाटेवर

सख्या, तुझ्या वाटेवर
पापणीच्या पायघड्या
आसवांनी सुगंधिल्या.

सख्या, तुझ्या वाटेवर
नजरेची रोषणाई :
नयनींची नवलाई.

सख्या, तुझ्या वाटेवर
नाद घुमे नगाऱ्याचा :
हृदयींच्या स्पंदनाचा !

नाही, येणार तूं नाही
तरी स्वागताचा थाट
आणि पाहतें मी वाट !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ..................
क्रमांक ........................ नोंद दि: ..................

# गजांतुनी मी

गजांतुनी मी पाहत बसलें
आकाशाचें सुनीळ मार्दव,
नारिंगी कौलारें रेखिव,
कुंपणवेलीं हिरव्या कातिव :
रंगविलासीं हृदय लोभलें.

पाताळांतुनि सरसर आलीं
लोखंडाचीं मुसळें भीषण;
आकाशाला भिडलीं जाउन;
पुरें टाकिलें मजला घेरुन :
किंकाळी हृदयाची थिजली !

## पत्र्याचे कपटे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९५५६५
दा. क.
ग्रंथ (आकार) (संख्या) प्रत)

पत्र्याचे कपटे सरपटत
येऊन पडले माझ्या पायाशीं.
निळ्या शाईचे शब्द रेखीव
पाहती वर, केविलवाणे.
नजर त्यांची चुकवुनी मी
निघालें धावत गाडी साधण्या;
लागे काय धाप—केवढें स्पंदन !

फलाटावरून हालली गाडी,
समोरून माझ्या गेली वेगांत;
आणि मी उभी, उभी तेथेच
पाहत पुढे विस्फारून डोळे.
वाऱ्याची ओढ, धुराचा लोळ;
लाल ठिणग्या आल्या डोळ्याशीं.
घेतले घट्ट जे मिटून डोळे
उघडूं पाहतां नाही जाणीव !
बंद पापण्या बंदच झाल्या.
आंधळी झालें--पुरी आंधळी
आणि बाजूंनी गळलीं आसवें.

टेकले तोच नयनावरी
थंडगार ओठ : तुझाच स्पर्श
—तुझाच परी गोठल्या रक्ताचा;
भीतीने, प्रीतीने दडपलें ऊर !
असाहाय्य डोळे वर पाहती :
मलीन कौलार, क्षीण झरोके,
मलिच्छ कोळी काढून धागे
गुंफीत होता जाळें आपुलें !

## चांदणें

चांदण्याची रात्र गोड
लोचनांत साठवूनी,
मिटूनिया घ्यावी वर
हळू, नाजूक पापणी !

आणि त्याच चांदण्याची
उभारावी स्वप्नसृष्टि;
रातभर जीवावर
व्हावी अमृताची वृष्टि !

# पाखराच्या पिसापरी

पाखराच्या पिसापरी
संध्यारंग विखुरले,
उष्ण-शीत खारा वारा
धुंद सावकास चाले !

नुकताच ओसरला
उधाणाचा मत्त पूर;
शांत तृप्त सागराचें
पाणी पोचे दूरवर !

सुखावली धरणी ही
पडे मिटूनिया डोळे;
ओल्या सुस्त रेतीवर
मनांतील स्वप्न खेळे !

उभी पाहत मी दृश्य
किती वेळ, किती वेळ;
उसळती गोड भाव :
एक तुला कळतील !

## घुंगुर

माझ्या मनिंचें खुळें पाखरू
मणिबंधावरि तुझ्या उतरलें;
आणिक तूं तर दुष्टनष्टसा
घुंगुर त्याच्या पदीं बांधिले

# धूसर विरल

धूसर विरल श्यामल आभाळ
फिकट पांढरें सूर्याचें वर्तुळ
पांढरें गढूळ रेशमी ऊन
मधूनमधून धारांची शिंपण !

खालती हिरवा सतेज माळ
पिवळ्या लहरी, पिवळी झळाळ
उंच या वृक्षांना पिवळा मोहोर
बिंदूंत बिंदूंत पिवळें अंबर.

प्रेमळ सावळी कोण ही जननी;
गोमटें तान्हुलें पायावरी न्हाणी !
तेलाहळदीचें पिवळें कोवळें
सतेज बालक, रूपच आगळें !

चांदीचा कलश, अमृताचें पाणी :
बाळाचें कौतुक करीते जननी;
जाईल तें पाणी सागराच्या तळीं
देईल वैडूर्यरत्नांना झळाळी.

त्याच पाणीयाचा घेऊन मुलामा
येईल अंबरीं पिवळा चंद्रमा !

## आली माहेरपणाला

आली माहेरपणाला :
आणा शेवंतीची वेणी,
पाचूमरव्याचे तुरे,
जरीकुसर देखणी !

आली माहेरपणाला :
आणा रवा-तूप-लोणी;
केशरवेलचीचा
वास भरे कोनोकोनीं !

आली माहेरपणाला :
चाले कौतुक सोपयांत,
माजघरीं, चुलीपाशीं,
झेंडूच्याही फुलोऱ्यांत !

कौतुकाची गोड लाट
अशी येतां अंगावर
थरथर पापणींत
आणि डोळे कुठे दूर !

नव्या जाणिवेची कळ
कशी कुणा सांगायाची;
नव्या संसाराची राणी —
राणी नाही हृदयाची !

# बोलायाला निवांत कांही

बोलायला निवांत कांही
हॉटेलामधि शिरलों आपण
आणिक कुठल्या उत्साहाने
मागविलेही पदार्थ खच्चुन.

बोलावें तो—तशी नेमकी
जाणिव झाली कशी विसंगत :
नव्हतें कांहिच बोलायाला;
डोळे होते डोळा चुकवित.

न्याहाळित मी जपानि तरुणी;
तूंहि काढली नोट खिशांतुन;
अर्धा कपही चहा न सरला :
निमुटपणाने उठलों तेथुन !

नकळत वळलीं दूर पावलें
कशांतून तरि सुटलों वाटुनि;
नकळत वळले बाजुस डोळे
परतायाची ओढ लागुनी !

# नादतंद्रा

नादतंद्रेची लागतां चाहूल
लोटावी मंचकीं अधीरी काया
आणखी द्यावें पूर्ण अवधान—
नाजूक पावलें, नाजूक आघात
नाचतें हृदय, चालतें स्पंदन
नर्तनलहरी आघातनाद
रोमारोमांत, नसानसांत
गेले भिनून नादच नाद !

घड्याळ काढी नाजूक शब्द
पाखरू बोले वळचणीशीं
आगगाडीचे धावते ताल
ऐकत नाचे बेहोष हृदय
पिऊन कांही विलक्षण मद्य !

रसरसली कानाची पाळी;
डोळ्यांत आली मदिर आग;
पायाचीं बोटें चाटलीं जणू
पाताळांतील दिव्य नागिणींनी;
भारावले डोळे घेतले मिटून !

सुसाट धावता भीषण मेघ
प्रचंड काळी समुद्रलाट
घोंघावणारा तुफानी वारा
धरूनी यांची उन्मत्त अंगुली
नाचतें हृदय द्रुत लयींत !

हातांत कुणाचा कढत स्पर्श
पायावरी कुणी फिरवी हात
कपाळावरी कोमल बोटें
बोचलें दंडांत तसेंच कांही
आणि उसळली काळोखाची धूळ !

उसळून आले काळया धुळींतून
हिरवे निळे लाल पिवळे
गोल ठिपके, गोल चांदण्या;
तेजोगोलावरी टाकत पावलें
नाचत हृदय चाललें पुढे !

धुळीचा झाला भीषण सागर
काळेंच पाणी : कुठे न क्षितिज
आणिक ऐकूं ये धावत येणाऱ्या
प्रचंड लाटेची मादक गर्जना;
लागून विचित्र ओढ आंतून
चाललें हृदय जवळ जवळ !

जाणिवेचे कांही उरले तुकडे
पडले येऊन किनाऱ्यावर :
रुग्णालयींचा लोखंडी पलंग
रिकामा रिकामा आणि उलटा;
आतुर लाडिक बाळाची हाक;
दैनिकांतील ठळक अक्षरें
'इंदिरा निघाली जपानला' हीं !

आणिक आल्या चारी बाजूंनी
कभिन्न काळ्या लाटाच लाटा;
नादावलें पुरें हृदय निघालें
खालती खालती, आंतच आंत !

## दीपावली

उघडून ऊजदार
        क्षणभर रेंगाळावें
आणि समोर सृष्टीने
        डोळे भरून हसावें !

येई तोच दूधवाला;
        कुशल समाचार
भांड्यांत धार तशी
        नयनींही स्नेहधार !

येई तसा कामवाला :
        ओठांत कांही छंद;
भांड्यांना स्वर्णकांति
        आणि डोळ्यांत आनंद !

किलबिल गोड गोड :
        जागें होई घरकूल;
हासऱ्या लोचनांचा
        मग घरभर खेळ !

दुपारच्या वेळीं
        दाराशीं मुके प्राणी
पोरके, भुकेलेले
        प्रेमें भरल्या लोचनीं !

मित्रमैत्रिणींचें
        भरे संध्यासंमेलन;
स्नेहाळ डोळ्यांतून
        स्नेहज्योतींची उधळण !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम......................... दि: ..........
क्रमांक ......................... नोंद दि: ..........

अंतरींच्या अंतरांत,
हृदयाच्या गाभाऱ्यांत,
जीवसख्याची नजर
तेवते शांत शांत !

अशी माझ्या घरींदारीं
अक्षय दीपावली;
माझ्यांतील अमावास्या
तिच्यामुळे सुखावली !

## पतंग

अंधारून येतां दारीं
लावतें मी शामदान
आणि पतंगांचा थवा
आंत येतसे धावून !

सुकुमार जलरंगी
पंख त्यांचे थरारती;
फेर धरून नादाने
ज्योतीवरी झेप घेती !

आलें लोचनांत पाणी
पाहून ती वेडी ओढ;
आलें ओठावरी हासू
पाहून तें वेडें वेड !

आज काळोखतां घर
लावी कुणी शामदान
आणि पतंगांचा थवा
आंत येतसे धावून !

त्याच ओढीने, वेडाने
कोसळती ज्योतीवरी;
पंख जळल्या कायेची
तळमळ काचेवरी !

पाहतें तो आत्मयज्ञ
रुक्ष नजर लावूनी;
नाही ओठावरी हासू,
नाही लोचनांत पाणी !

# अजूनीही

अजूनीही जागा आहे
स्पर्श तुझा कायेवरी
आणि अंगाचा सुगंध
खेळतसे श्वासावरी !

अजूनीही जसे तसे
बोल तुझे श्रवणांत
आणि नयनींचे भाव
उभे नीलारोहिणींत !

तुझ्यांतील सारें तुझें
आहे जरी बिलगून;
दिसामाशीं तुला परी
चाललें मी विसरून !

## अकालीं येती

अकालीं येती काळे नि सुंद
मेघ जमून घेरून नभांत;
वाहतो तसा थंड ओलासा
हवाहवासा वाऱ्याचा झोत :
निरागस तरी लोचट लाघट
हासरा चावरा !

अधिऱ्या उत्कट कढत कायेच्या
कणाकणांत रोवतो अल्लद
नाजूक दांत. दाबतो कळ—
आणि मनींची दिव्य वसाहत :
इवले सोनुले फिके जांभळे
काचबंगले !

लागती त्यांत मंद नि धुंद
हिरवेनिळे विजेचे दिवे;
नाजुकपंखी परागकोमल
संवेदना परी करती नर्तन :
अंधुक देखणें लोभस दृश्य :
गंधर्वनगरी !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम........................ दि: ...
क्रमांक ........................ नों दि: ........

# मध्यरात्रीं

मध्यरात्रींच्या शीतळ अंधारीं
स्वच्छ अंतराळीं
अवचित आलें कांहीसें हालून :
उठलीं वलयें;
सागराची लाट किनाऱ्यापाशींच
आली उसळून;
हवाही हलली; क्षण थरारलीं
नारळीचीं पातीं;
आभाळांतील नक्षत्र तेंही
कललें क्षणैक;
मनोमनाला वेढून टाकी
भावतरंग;
आता त्यांतून पडाया बाहेर
धडपडतांना—
कासावीस मन होणार विकल
विव्हल वायाळ !

## भृंग

भृंग यावा—यावा परी
        उमलत्या कमळांत
पहाटेच्या स्वप्नामध्ये
        येसी तसा अभावित !

विसरून सारें कांही
        उतावीळ मन भोळें
धावूनिया होई पुढे
        उघडून दोन्ही डोळे !

आल्या तोच कौलांतून
        लोहसळया तप्त लाल
आणि अश्राप डोळ्यांत
        उठे धूर—काळा जाळ !

## भाग्यलक्ष्मी

घराची ही भाग्यलक्ष्मी
उभी सदाची घरांत;
फिरे तिच्या मागुनीया
शीत सुगंधित वात !

दिठीमधे चंद्रधारा;
ओठीं फुलें आनंदाचीं
कायेमध्ये लवे वीज;
हातीं चव अमृताची !

घरादाराचा विसावा;
शेजाऱ्यांना नित्य ओढ;
आल्यागेल्या पाहुण्याचे
निघतांना पाय जड !

दिसभर कष्ट-शीण
जडावती पापणींत;
जादुभरल्या ओठाने
टिपूनिया घेई कांत !

## अशुभ

करकरे तिन्हीसांज
काय अशुभसूचक;
कशीं कातर पाखरें
कोटरांत झालीं मूक !

काळवंडली धरित्री;
मनीं कशाचें काहूर;
तारकांच्या कुंडलींत
पाही प्रश्नाचें उत्तर !

धुरकट अंधारांत
कोण टाकते उसासा :
श्रांत, क्लांत माझें मन
घेई सारखा कानोसा !

इथेतिथे उगीचच
वावरत राहे कोण ?
कोण आहे उभे तेथे
उगीचच खोळंबून ?

श्वास लपे आंत आंत;
ओलीचिंब झाली सूठ;
हृदयींचा रावा परी
फडफडे पिंजऱ्यांत !

## पूर्ण विराम !

अर्ध-स्वल्प-विरामांचें
        रेंगाळणें जीव घेत;
उद्‌गाराची तशी कांडी
        उगा जीव भुलवीत !

प्रश्नचिन्हाचा हा हूक
        गळां घालतो संकट;
अर्धस्फुट रेषेमाजी
        वाद‌ळाची घुसमट !

वाटे तुला शिकवावें
        आता एक—एक चिन्ह :
अर्ध्याअपुऱ्या वाक्याशीं
        पूर्णविरामाची खूण !

# विस्तीर्ण गुहा ही

विस्तीर्ण गुहा ही : आंत किती अंधार
अन् दर्प तयाचा जुनाट बाधिक गार.
रोखून पाहतां तम घेतें आकार;
हलतात आकृती स्तब्धपणाने दूर.

ही धूळ भुईची : पाउल दचके तींत;
हिमकठोर भिंती : स्पर्श करीना हात.
या दारांतुन ये क्षीण उनाचा झोत;
दावितो दुतर्फा स्तंभ उभे रांगेत.

हीं युगें उभीं का घेउनिया आकार :
कुणि कराल दाढा, दावी कुणि अभिसार.
त्या स्तंभामागे दगडी भव्य कमान;
ध्यानस्थ तीमध्ये बुद्ध भव्य अन् दीन.

निर्बुद्ध हास्य तें विलसे वदनावरती
अन् तशीं ढापणें पुरींच डोळयांवरती.
ये क्षीण उसासा कोठुन की माझाच;
त्या वातावरणीं घुमे केव्हढा तोच.

दचकून घेत मी स्तंभाचा आधार
तो हसे खदाखदा त्यांत कुणी भेसूर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्र
अनुक्रम ........................ दि: ..........
क्रमांक ........................ नोंद दि: ..........

## सोन्याची घागर

सलज्ज संध्यारमणी नवथर
सोन्याची करिं घेउन घागर
क्षीरसागरावरी वाकुनी
घेत काय ही अमृत भरुनी !

तोंच कुणाची लागुनि चाहुल
अजाणतां हो मन पर्याकुल;
अंगांगांतुन सुखकर थरथर
हातांतुन अन् सुटली घागर !

दचकुन पाहे दूर समोर—
कुणि पुरुषोत्तम श्यामल सुंदर;
करीं तयाच्या तिचीच घागर;
खुणवी : 'रमणी येई येथवर' !

सावरून जरतारी अंचल,
झाकुन डोळ्यामधली दौलत,
गालावरल्या खळीमधें अन्
लपवुन हृदयामधलें ईप्सित

लगबग मागे फिरली बाला;
पळालीच मग किती बावरुन;
जातां जातां परि घाईने
तुटला पायामधला पैंजण !

आणि उभा तो तसाच तेथे
काय लागली प्रीतिसमाधि ?
नयनांतरिं ये धुंद चांदणें
धुंद श्वसन अन् पुष्पसुगंधी !

# आ ग गा डिं ति ल खि ड की पा शीं

आगगाडिंतिल खिडकीपाशीं
डोळ्यांच्या सज्जांत येउनी
माझ्या मनिंच्या गोड सारिका
उभ्या राहिल्या ओठंगोनी !

मला न कळलें केव्हा कोठे
हळूच अन् एकेक पळाली;
प्रवासांतुनी जरी घरीं मी
उगाच मनिंची जाणिव शिणली !

रात्र भुरभुरे जरी चांदणें
अंगाईचीं गाउन गीतें
हुरहुर आंतुन तशीच जागी
उगा कुणाची चाहुल घेते.

आल्या आल्या तोच सानुल्या
"किती सुखी मी" सांगत मजला;
किती विलक्षण नादी पोरी
मला बिलगल्या की ग्रहमाला !

धुकें अडकलें केसांमधुनी;
गारगार किति गाल नि ओठ;
शिखरावरचा मेघ सावळा
चुंबुन आली ही तर थेट !

हिने खोविले केसांमधुनी
तुरे साजिरे रानफुलांचे;
घमघमली तर अवघी काया
सौख्य भोगिलें मोहफुलांचें !

नाजुक भितऱ्या डाळिंबीची
लालभडक अन् तशी धिटाई
शिकून आली ही लाजाळू :
पाहुन झालें विस्मित मीही !

वेडावुन ही पुरीच आली
कळकांच्या का बेटांमधुनी;
भोळ्या तिथल्या आठवणींची
शीळ घालुनी घुमवी गाणीं !

आल्या भरतीच्या या लाटा
पुरें टाकिलें मला भारुनी;
दुडुदुडु धावत तशाच शिरल्या
स्वप्नाच्या दुलईत गौळणी !

## कौतुक!

धावत हट्टी वारा अडवा :
आडविणारा हात तुझा का?
चमचम बसतो पाउस तिरपा :
ओळखिचा तो स्पर्श तुझा का?

कशी अशी मी गोंधळलें तरि !
पुढे सुळी ना पाउल उचले;
कसें आवरूं वस्त्र कळेना;
भिजल्या देहीं आग उफाळे !

तशांत वरती त्या घनमाला;
उभा भोवती माळ अगंतुक;
वाटेवरती मीच एकटी :
बघसि अंत की बघसी कौतुक !

# चतुर कुशल तूं

चतुर कुशल तूं रसिक सहेली :
गोड जिव्हाळा तुझ्या भाषणीं;
भुलून जातां बोलुन कांही
डावलसी तें सहज हासुनी !

कधी सहलतां वनश्रींतुनी
रसिकताच तूं संगें सुंदर;
शोभा दाविसि, रंगसि, रससी
चालसि, बोलसि राखुन अंतर !

तळव्यावरची कधी सुपारी
हळुच उचलसी दो बोटांनी :
शुभ्र पाखरू गोजिरवाणें
दाणा अल्लद घेतें टिपुनी !

हस्तांदोलनिं पुढे करावा
हात अधीरा समजावणिचा;
स्पर्श तुझा परि अबोल सावध :
पुरता कळतो अर्थ तयाचा !

विरक्तिची अन् आसक्तीची
अशी कशी ही तुझी भुलावण;
चिडतों, चिडतों परंतु भुलतों :
अशी कशी ही तुझी भुलावण !

# कोवळ्या अंधारीं

कोवळ्या अंधारीं दर्याच्या किनारीं
बसतें तशीच, एकटी एकटी.
एकटी कशी—तुझ्या विचारांत;
तुझ्या विचारांत रंगतां रंगतां
येते मनाला अशी कांहीशी ओढाळ मस्ती !

पाहती वरून सप्तर्षि चोरून :
काढावी खोडी हळूच त्यांची;
ओढावी दाढी !
व्याध-मंगळ-अभिजितांचे
रंगेल खडे आणावे चोरून :
तुझ्या शर्टाचीं होतील बटणें बोटचाळ्याला !
कृत्तिकासमूह घेऊन हातांत
होऊन अल्लड मांडावा खेळ
सागरगोट्यांचा—पांचाखाचाचा !
मस्तींत येणाऱ्या ताठर लाटेचा
ओढावा पदर; आणि लपावें वाळूच्या आड !
शिरावें थेट दर्याच्या कुशींत
आणि निथळावें अंगावरून खारट पाणी—
पाण्याचे थेंब !

अशी कांहीशी ओढाळ मस्ती
येते मनाला
तुझ्या विचारांत रंगता रंगतां...

## समर्पण

येतां कधितरि जाग अवेळीं
दूर ऐकुं ये तुझेंच घोषित;
तशाच लाटा जादुगारिणी
नजरेला मम नेती भुलवित !

अशी सदाची मनोमनीं तर
ओढ तुझ्या रे सहवासाची;
तुझ्या किनाऱ्यावरी सागरा,
लटकें जीवन विसरायाची !

रंगांची तव चंचल माया :
तींत सदाचा जीव डुबावा,
वारा खारट मासोळीचा
अंगावरती अलगद ल्यावा !

तुझ्या नीळसर क्षितिजावरती
फसवीं स्वप्नें मम वितळावीं;
सुखदुःखें अन् अवघड, हलकीं
तुझ्याच लहरींवरी हलावीं.

गभीर सुंदर तुझी कहाणी
लाटांनी मज कथन करावी;
माझ्या मनिंचीं वाक्यें अपुरीं
पुरीं कराया वाहुन न्यावीं !

चकित राहुनी किनाऱ्यावरी
तुझें पहावें कठोर तांडव;
लाटांवरती हेलकावतां
जाणावें तव समर्थ मार्दव !

तुझीं तुफानें, तुझीच शांती,
तुझीच भीती, तुझी भुलावण :
तुझेंच घ्यावें रूप मनाने
आणिक व्हावें तुला समर्पण !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों दि: ........
REFBK-0015575
REFBK-0015575

# चंद्रकोर

आठवतें प्रेम तुझें :
पूर्ण चंद्र पौर्णिमेचा
तसा तुझा सहवास
झिरीझिरी चांदण्याचा !

चांदण्याची दुरावण
आहे तशीच सुंदर;
हृदयाच्या काठावरी
टेकलेली चंद्रकोर !

चंद्रकोरीची जखम
ताजी सदा हृदयांत;
उजळते तिच्यांतून
क्षीण चांदण्याचें रक्त !

वा. क्र. १५५७५